# नवे काव्यसंग्रह

## सावरकरांची कविता
संपादक : प्रा. वा. गो. मायदेव
पृष्ठें २०७, मूल्य दीड रुपया

## मधुपर्क
पुरुषोत्तम मंगेश लाड
पृष्ठें ९८, मूल्य एक रुपया

## मानसमेघ
गिरीश
पृष्ठें ८७, मूल्य दीड रुपया

## यशोगिरी
राजकवि यशवन्त
पृष्ठें ११९, मूल्य दीड रुपया

## रवींद्रनाथांचा शिशु
महादेव काशीनाथ कारखानीस
पृष्ठें १०३, मूल्य एक रुपया

## संपदा
सोपानदेव चौधरी
पृष्ठें १००, मूल्य दीड रुपया

## चन्देरी लहरी
शान्ताराम आठवले
पृष्ठें १००, मूल्य दीड रुपया

## मधुबोल
सदाशिव अनन्त शुक्ल
पृष्ठें १००, मूल्य दीड रुपया

केशव भिकाजी ढवळे, मुंबई

# उज्ज्वला-



कृ. ब. निकुम्ब-

१९४५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १२८४

REFBK-0006654
REFBK-0006654

१९४५

अनुक्रम
तिथि
क्रमांक

# उज्वला

[ निवडक कवितांचा सङ्ग्रह ]

कृ. ब. निकुम्ब

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

REFBK-0006654

REFBK-0006654

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

★ २१ ★

मूल्य सव्वा रुपया

मुखपृष्ठ
दत्तात्रेय
गणेश
गोडसे

■

मुद्रक
र.रा. बखले
मुंबई
वैभव
छापखाना
मुंबई ४

■

प्रकाशक
केशव
भिकाजी
ढवळे
मुंबई ४

■

प्रथमावृत्ति
१९४५

■

सर्वाधिकार
लेखकाधीन

■

■

ती. दादास व बाईस—

' "माझा मऱ्हाठाचि बोलु कवतुकें॰ "
ज्ञानदेवा ! वच अमृतासारखे
रात्रन्दिन आळवो सुखें—
वैखरी माझी !'

# प्रस्तावना

अनुक्रम २०४८३
विभाग
क्रमांक

नियतकालिकांत प्रसिद्ध होणाऱ्या कविता कोणी काळजीपूर्वक वाचीत असेल काय, असा कधींकधीं मलाच प्रश्न पडतो. मी मात्र पहिल्यानें बहुतेक सर्व कविताच वाचीत असतों. मला जर एकाद्या कवीची कविता आवडली तर त्या कवीच्या पुढल्या कविता विशेषच उत्कंठेनें वाचतों. त्यांतल्या कांहीं कवींची आणि माझी अजून नुसती नांवापुरतीच ओळख आहे, पण मनांत मात्र त्यांचें व्यक्तिचित्र उभें होत असतें. नवोदित कवींमध्यें श्री. निकुम्ब ह्यांच्या कविता मला आवडल्या. त्यांच्या कवितांकडे विशेष लक्ष लागून राहिलें. त्यांच्या काव्यावरून त्यांचें मी जें मनश्चित्र काढलें होतें तें मात्र प्रौढ व्यक्तीचें होतें. आणि कां नसावें ?

हेलावल्या हृत्सागरीं ये गूढ आतां शांतता
हृदया हवें तें लाभलें, जें ये न बोलुनि दावितां
ये या क्षणाप्रत शाश्वती, ये प्रत्यया समृद्धता
निस्तब्ध या पृष्ठावरी निर्मूं नको वलयें पुन्हा
रे, संपल्यावर भैरवी छेडूं नको स्वर मोहना ! (४३)

ह्या ओळींतील शब्दरचनाच मला प्रौढ वाटली होती असें नाहीं तर त्या ओळी लिहिणाऱ्या कवीची वृत्तीही गंभीर वाटली होती आणि भावनाही समृद्ध वाटली होती. पण नाशिकच्या साहित्यसंमेलनाच्या वेळीं जेव्हां निकुम्बांची आणि माझी भेट झाली तेव्हां मी एक प्रकारच्या सुखद संभ्रमांतच पडलों ! ह्या कविता लिहिणारा कवि निकुम्ब हा विशीच्या आसपासचा बी. ए. चा विद्यार्थी आहे तर ! पण मीच हें विसरलों कसें, कीं कविमनाचा विकास आणि काव्य कुशलतेची वाढ वयाबरहुकुमच होत असते असें नाहीं म्हणून ?

ती वाढ दिनांच्या संवत्सरांनीं मोजायची नसते, तर मनाच्या संस्कारांनीं मोजायची असते, हें प्रसिद्ध कवींच्या जीवनकार्यांत नाहीं का दिसत ?

निकुम्बांच्या ह्या काव्यसंग्रहांतील कवितांचा आस्वाद घेतल्यावर माझ्या-प्रमाणेंच वाचकांनाही अनुभव येईल, कीं निकुम्बांचें कविमन निरनिराळ्या प्रकारच्या भावनासंघर्षांतून गेलेलें आहे. त्यांच्या रसाळ काव्याच्या मागें त्यांना ह्या संघर्षांतून मिळालेला आत्मप्रत्यय आहे. त्या प्रत्ययाचा माझ्या मनाची पकड घेणारा विशेष म्हणजे एक प्रकारच्या गूढ शांततेचें वातावरण. तें मराठी काव्यांत ( अर्थात् आधुनिक ) किती क्वचित् सापडतें हें मला माहीत आहे. कवीनें एक विशिष्ट प्रकारचें वातावरण निर्माण केलें पाहिजे, त्याच्या काव्यानें वाचकाच्या मनाची पकड घेत घेत, त्या काव्याचा परिपाक अशा एका वातावरणांत शेवटीं वाचकांचें मन नेऊन ठेविलें पाहिजे, हा काव्याचा एक आल्हादकारक विशेष आहे हें आमचे टीकाकारही तितक्याच क्वचित्पणें दाखवितात. अशा परिस्थितींत निकुम्बांच्या काव्याचा हा विशेष मला अधिकच उत्कटतेनें जाणवला.

गूढ शांततेचें वातावरण निर्माण करण्याचा निकुम्बांना जणूं हव्यासच आहे. त्यांना सृष्टीचें सौंदर्य तीव्रपणें जाणवतें तेव्हां सृष्टीचें स्वरूप शांत, रम्य, उदास आणि उदात्त असतें.

सृष्टी पांघरुनी यदा मखमली अंगावरी चांदणें
निद्रा घेइ निवांत–शांति भंवतीं दाटूनिया राहते
मी–निर्बंध न कांहिं, छे ! भटकतों धुंदींत माळावर
शांत स्तब्ध विभावरी मज अशी संमोहिनी घालिते ( ३९ )

अशा रम्योदात्त सौंदर्यानें हेलावलेल्या वृत्तींतून त्यांच्या कितीतरी कविता स्फुरलेल्या आहेत. त्या वृत्तींत आत्मप्रत्ययाची खूण दिसते. तें प्रतीतीचें बोलणें

वाटतें. तेथें त्यांची वाणी अधिकच हलुवार बनते, रचनेंत तालबद्ध प्रवाहित्व येतें आणि त्या सर्व कवितेला परिपूर्णता प्राप्त होते. त्यांची

हळूहळू येई रात दुनियेच्या महालांत
काजळाया लागले नी नभ–गिरि, भातशेत
छाया भंगल्या घाटाची–नदींतल्या जळांतली
गेली पुसून पडतां काळ्या रात्रीची साउली ! (३१)

ही चिमुकली कविता ह्या दृष्टीनें पुनः पुन्हा वाचण्यासारखी आहे. ती एखाद्या दंवबिंदुसारखी चमकदार आहे. दंवबिंदुइतकीच स्तब्धपणें रात्रीच्या अवकाशांत जणूं ती कविता मनाच्या पात्यावर निर्माण झाली आहे. ह्या कवितेंतील शांतपणा, संयम, साध्या रोजच्या दृश्यांतलें अनिर्वचनीय सौंदर्य जाणून घेण्याची व तें साधें सौंदर्य तितक्याच साध्या शब्दांत व्यक्त करण्याची शक्ति, हें सर्व पाहून कोणाही रसिकाचें मन मोहून जाईल.

ह्या आणि अशाच इतर कवितांतील निकुम्बांच्या प्रतिमासृष्टीचेंही निरीक्षण करण्याजोगें आहे. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधादिक संवेदनांनीं त्यांचें मन सृष्टिसौंदर्यांत विलीन होतें. त्यांच्या द्वारें प्रत्यक्षाचा सर्वंकष आस्वाद घेत घेत हळूहळू त्यांना सौंदर्यसमाधि लागते. ही सौंदर्यसमाधि म्हणजे निकुम्बांच्या काव्यजीवनांतला सर्वांत आनंदाचा क्षण होय.

साक्षात्कार अनंत होऊन असें-साकार मूर्ती तुझी
माझ्या राहिलि, रेखिल्यासम उभी, सौंदर्य-देवी हृदीं
कांतीनें तव गे, पुरें उजळिलें माझें मनोमंदिर....
झालों आपण एकरूप – गमतें ‘ सौंदर्य हें जीवन !” (३४)

हे उद्गार त्या आनंदांतूनच उत्स्फूर्त झालेले आहेत.

‘ “ माझा मऱ्हाठाचि बोलु कवतुकें० ”
ज्ञानदेवा ! वच अमृतासारखे
रात्रन्दिन आळवो सुखें—
वैखरी माझी ! ’

अनुक्रम २७०६३
विभाग का-कवि
क्रमांक ४४८.१
२३२९

# प्रस्तावना

नियतकालिकांत प्रसिद्ध होणाऱ्या कविता कोणी काळजीपूर्वक वाचीत असेल काय, असा कधींकधीं मलाच प्रश्न पडतो. मी मात्र पहिल्यानें बहुतेक सर्व कविताच वाचीत असतों. मला जर एकाद्या कवीची कविता आवडली तर त्या कवीच्या पुढल्या कविता विशेषच उत्कंठेनें वाचतों. त्यांतल्या कांहीं कवींची आणि माझी अजून नुसती नांवापुरतीच ओळख आहे, पण मनांत मात्र त्यांचें व्यक्तिचित्र उभें होत असतें. नवोदित कवींमध्यें श्री. निकुम्ब ह्यांच्या कविता मला आवडल्या. त्यांच्या कवितांकडे विशेष लक्ष लागून राहिलें. त्यांच्या काव्यावरून त्यांचें मी जें मनश्चित्र काढलें होतें तें मात्र प्रौढ व्यक्तीचें होतें. आणि कां नसावें ?

> हेलावल्या हृत्सागरीं ये गूढ आतां शांतता
> हृदया हवें तें लाभलें, जें ये न बोलुनि दावितां
> ये या क्षणाप्रत शाश्वती, ये प्रत्यया समृद्धता
> निस्तब्ध या पृष्ठावरी निर्मूं नको वलयें पुन्हा
> रे, संपल्यावर भैरवी छेडूं नको स्वर मोहना ! (४३)

ह्या ओळींतील शब्दरचनाच मला प्रौढ वाटली होती असें नाहीं तर त्या ओळी लिहिणाऱ्या कवीची वृत्तीही गंभीर वाटली होती आणि भावनाही समृद्ध वाटली होती. पण नाशिकच्या साहित्यसंमेलनाच्या वेळीं जेव्हां निकुम्बांची आणि माझी भेट झाली तेव्हां मी एक प्रकारच्या सुखद संभ्रमांतच पडलों ! ह्या कविता लिहिणारा कवि निकुम्ब हा विशीच्या आसपासचा बी. ए. चा विद्यार्थी आहे तर ! पण मीच हें विसरलों कसें, कीं कविमनाचा विकास आणि काव्य कुशलतेची वाढ वयाबरहुकुमच होत असते असें नाहीं म्हणून ?

ती वाढ दिनांच्या संवत्सरांनीं मोजायची नसते, तर मनाच्या संस्कारांनीं मोजायची असते, हें प्रसिद्ध कवींच्या जीवनकार्यांत नाहीं का दिसत ?

निकुम्बांच्या ह्या काव्यसंग्रहांतील कवितांचा आस्वाद घेतल्यावर माझ्या-प्रमाणेंच वाचकांनाही अनुभव येईल, कीं निकुम्बांचें कविमन निरनिराळ्या प्रकारच्या भावनासंघर्षांतून गेलेलें आहे. त्यांच्या रसाळ काव्याच्या मागें त्यांना ह्या संघर्षांतून मिळालेला आत्मप्रत्यय आहे. त्या प्रत्ययाचा माझ्या मनाची पकड घेणारा विशेष म्हणजे एक प्रकारच्या गूढ शांततेचें वातावरण. तें मराठी काव्यांत ( अर्थात् आधुनिक ) किती क्वचित् सापडतें हें मला माहीत आहे. कवीनें एक विशिष्ट प्रकारचें वातावरण निर्माण केलें पाहिजे, त्याच्या काव्यानें वाचकाच्या मनाची पकड घेत घेत, त्या काव्याचा परिपाक अशा एका वातावरणांत शेवटीं वाचकांचें मन नेऊन ठेविलें पाहिजे, हा काव्याचा एक आल्हादकारक विशेष आहे हें आमचे टीकाकारही तितक्याच क्वचित्पणें दाखवितात. अशा परिस्थितींत निकुम्बांच्या काव्याचा हा विशेष मला अधिकच उत्कटतेनें जाणवला.

गूढ शांततेचें वातावरण निर्माण करण्याचा निकुम्बांना जणूं हव्यासच आहे. त्यांना सृष्टीचें सौंदर्य तीव्रपणें जाणवतें तेव्हां सृष्टीचें स्वरूप शांत, रम्य, उदास आणि उदात्त असतें.

सृष्टी पांघरुनी यदा मखमली अंगावरी चांदणें
निद्रा घेइ निवांत–शांति भंवतीं दाटूनिया राहते
मी–निर्बंध न कांहिं, छे ! भटकतों धुंदींत माळावर
शांत स्तब्ध विभावरी मज अशी संमोहिनी घालिते ( ३९ )

अशा रम्योदास सौंदर्यानें हेलावलेल्या वृत्तींतून त्यांच्या कितीतरी कविता स्फुरलेल्या आहेत. त्या वृत्तींत आत्मप्रत्ययाची खूण दिसते. तें प्रतीतीचें बोलणें

वाटतें. तेथें त्यांची वाणी अधिकच हळुवार बनते, रचनेंत तालबद्ध प्रवाहित्व येतें आणि त्या सर्व कवितेला परिपूर्णता प्राप्त होते. त्यांची

हळूहळू येई रात दुनियेच्या महालांत
काजळाया लागले नी नभ–गिरि, भातशेत
छाया भंगल्या घाटाची–नदींतल्या जळांतली
गेली पुसून पडतां काळ्या रात्रीची साउली ! (३१)

ही चिमुकली कविता ह्या दृष्टीनें पुनः पुन्हा वाचण्यासारखी आहे. ती एखाद्या दंवबिंदुसारखी चमकदार आहे. दंवबिंदुइतकीच स्तब्धपणें रात्रीच्या अवकाशांत जणूं ती कविता मनाच्या पात्यावर निर्माण झाली आहे. ह्या कवितेंतील शांतपणा, संयम, साध्या रोजच्या दृश्यांतलें अनिर्वचनीय सौंदर्य जाणून घेण्याची व तें साधें सौंदर्य तितक्याच साध्या शब्दांत व्यक्त करण्याची शक्ति, हें सर्व पाहून कोणाही रसिकाचें मन मोहून जाईल.

ह्या आणि अशाच इतर कवितांतील निकुम्बांच्या प्रतिमासृष्टीचेंही निरीक्षण करण्याजोगें आहे. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधादिक संवेदनांनीं त्यांचें मन सृष्टिसौंदर्यांत विलीन होतें. त्यांच्या द्वारें प्रत्यक्षाचा सर्वंकष आस्वाद घेत घेत हळूहळू त्यांना सौंदर्यसमाधि लागते. ही सौंदर्यसमाधि म्हणजे निकुम्बांच्या काव्यजीवनांतला सर्वांत आनंदाचा क्षण होय.

साक्षात्कार अनंत होऊन असें-साकार मूर्ती तुझी
माझ्या राहिलि, रेखिल्यासम उभी, सौंदर्य-देवी हृदीं
कांतीनें तव गे, पुरें उजळिलें माझें मनोमंदिर....
झालों आपण एकरूप – गमतें ' सौंदर्य हें जीवन !" (३४)

हे उद्गार त्या आनंदांतूनच उत्स्फूर्त झालेले आहेत.

मराठी काव्यांत चांगलेंच वरचें स्थान गांठतील अशा निकुम्बांच्या कितीतरी कविता आहेत. पैकीं 'हळू हळू येई रात' ( ३१ ) आणि 'जीवन सौंदर्य' ( ३५ ) ह्या कवितांचा विशेष उल्लेख केलेलाच आहे. निकुम्बांच्या सर्वच काव्यांतील 'प्रसाद-चिन्हें' काव्यात्म, रसाळ, ध्वनिपूर्ण तशींच मोहकतेनें आकर्षक आहेत.

प्राजक्त न फुलला माझ्या परसामधें
दरवळून गेलें गंधानें मन तरी ! ( १ )

ह्या निकुम्बांच्या ओळींनींच त्यांच्या काव्याचें यथार्थतेनें वर्णन करतां येईल. हें काव्याचें 'श्रेय' प्रसन्न होऊन त्यांच्याकडे येत आहे आणि ही त्यांची 'उज्ज्वला' त्याचीं उमटलेलीं प्रसादचिन्हेंच होत. तें 'श्रेय' घेऊन येणाऱ्या काव्यदेवीला निकुम्ब 'कशी येशील' ( ३ ) म्हणून सांगतात ! पुष्पसाज लेऊन गंधराणी होऊन येऊं नकोस, भावगाणीं आलापीत गीतराणी होऊन येऊं नकोस, रुपेरी विभव घेऊन चांदराणी होऊन येऊं नकोस तर तेजोगर्भ अग्निसुमनें लेऊन ओजस्विनी होऊन ये ! अशी ओजस्विनी होऊन 'भविष्य काला' ( ६ ) ह्या कवितेंत निकुम्बांची स्फूर्ति अवतरली आहे. आजच्या उध्वस्त जीवनांत कर्तृत्वाचें निर्माल्य झालें आहे. तेंही पुन्हा उमलवील असें आगळें वैभव घेऊन, भोवतीं सोनेरी स्वप्नें सांडीत, गर्जत येणाऱ्या भविष्यकालाचें दर्शन ती स्फूर्ति निकुम्बांना देत आहे. असेच तेजःस्वर आळवीत त्यांनीं 'उज्ज्वले' चें ( ८ ) आवाहन केलें आहे.

हा 'ओजस्विनी' काव्यस्फूर्तीचा ध्यास निकुम्बांना त्यांच्या काव्यध्येयामध्यें सदैव जागृत ठेवतो. अशा जागृतींत 'उजळूं द्या फुलवात' ( ७ ) पण व्याकुळांसाठीं माझी अश्रूंची ओंजळ रिती होऊं द्या, जीविताच्या कोलाहलीं माझ्या गीताची तान घुमूं द्या, हिमवर्षवात माझ्या होमकुंडाचा उबारा मिळूं द्या, काजळाच्या सागरांत ही फुलवात उजळूं द्या आणि मानव्याच्या संरक्षणांत

तिच्यासवें पंचप्राण ओवाळूं द्या असें निकुम्ब म्हणतात. ' मी प्राजक्ताच्या शय्येवर झोपलों ' ( १० ) ही जाणीव त्यांना येते आणि तीच त्यांच्या ठिकाणीं उल्कापुष्पें शिरीं झेलण्याची तीव्र वांच्छा उत्पन्न करते.

ह्या ' ओजस्विनी ' स्फूर्तीचा ध्यास जसा प्रखर तसाच निकुम्बांचा सृष्टिसौंदर्याचा हव्यास भावमधुर आहे. संध्येचें रम्य आणि उदास सौंदर्य आणि त्यानंतर पसरणारी रात्रीची गूढ शांतता, निकुम्बांना विशेषपणें प्रतीत झालेली दिसते. तेथें त्यांच्या भावना अतीव हळुवारपणें खुलतात आणि फार मोहक शब्दचित्रें निर्माण करतात. त्यांचें हृदय त्या रम्य, उदास सौंदर्यांत आणि गूढ शांतींत लीन होतें. परस्परांच्या चेतनांचा संवाद,

झेंपावत अपुले विशाल काळे पंख
विश्वाच्या घरट्याकडे परतली रात
तरि पश्चिम क्षितिजीं हासत होती संध्या
आशेचीं किरणें जणुं माझ्या हृदयांत (१२

रात काजळी दाटे भंवतीं
गमते भीषण निगूढ शांती
लुप्त होय तारांची कांती
रोमांच शरीरीं थरथरते
मन केविं अकारण हुरहुरतें ? (२९ )

संध्या छाया मावळल्या–गेलीं पांखरें उडून
जीवनाचा उद्वेग ये–मन गेलें अंधारून ( ३० )

संध्या हळू पद टाकिते जगतावरी अनुरागिणी ( ३२ )

अशीं सुंदर शब्दचित्रें निर्माण करतो.

निकुम्बांचीं प्रमगीतेंही वैशिष्टयपूर्ण आहेत. किंबहुना प्रेमाचें पार्श्वसंगीत त्यांच्या सर्वच गीतांत आहे. कोठें तें स्पष्ट ऐकूं येतें तर कोठें ध्वनित होतें. त्यांत प्रेमभावनेच्या, आशा, निराशा, मीलन, विरह, ओढ, हुरहूर ह्या सर्व गोड छटा आहेत. ' बाई ! लाजून मी गेलें ? ' ( २१ ) ह्या गीतांत

दूरदूर कोठेंतरी घुमतात गोड सूर
आणि माझ्या हृदयाला लागे येथ हुरहूर

अशी प्रेमाच्या प्रथम परिचयाची जादू दिसते. ' कां गहिवर येतो ? ' ( १२ ) ह्या कवितेंत प्रेमनिवेदनानंतर सहानुकंपाची प्रतीति न झाल्यामुळें धगधगून निवान्त झालेल्या हृदयाची खंती चटका लावणारी आहे. तूं सहवासानें माझ्या हृदयाच्या अंधारांत क्षणांत तेज फुलविशील असा प्रेमाचा विश्वास ' ये बैस जरा ' ( २२ ) ह्या कवितेंत दिसतो. ' अकारण हुरहूर ' ( २९ ) हें तर एक अत्यंत भावपूर्ण प्रेमगीत आहे. प्रीतीच्या हुरहुरीचें ' कशासाठीं अंतराची ' ( ३० ) हेंही तितकेंच हळुवार आणि ध्वनिपूर्ण असें गीत आहे.

एखाद्या प्रसंगाची उत्कट जाणीव झाली म्हणजे निकुम्बांच्या लेखणींतून उत्तम भावगीत उतरतें. ' घाल घाल पिंगा वाऱ्या ' ( २६ ) ह्या कवितेंत ही साक्ष पटते.

घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसांत
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात !

ह्या पहिल्या दोन ओळींनींच लक्ष वेधलें जातें.

' सुखी आहे पोर सांग आईच्या कानांत ' ह्या ओळींतील समजूतदारपणाचें कौतुक वाटतें तोंच मनांतला खरा भाव हळुवारपणें बाहेर पडतो.

' आई भाऊसाठीं परी मन खंतावतं ! '

ह्या कवितेंत ग्रामीण जीवनाचें सुंदर आणि वास्तव प्रतिबिंब पडलें आहे. ती साधी भोळी माहेराची ओढ, गाईच्या वासरापासून भावाच्या लडिवाळपणा-पर्यंत सर्व आठवणीभोवतीं गुंगणारी भावना व त्या भाववलयांतून स्वाभाविक-पणें सुचणारी

कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय
माया माझ्यावर दाट जशी तुझी माय

ही उपमा — सारेंच आल्हाददायक आहे.

निकुम्बांनीं मोठ्या आवडीनें आणि हिरीरीनें मुक्तछंदाचा स्वीकार केला आहे. अलीकडे, त्यांना जेव्हां कांहीं विस्तारानें सांगावेंसें वाटलें किंवा एखादी भावना विशद करावीशी वाटली, तेव्हां तेव्हां त्यांनी सहजपणें व कौशल्यानें मुक्तछंदाचा उपयोग केला आहे. ही गोष्ट मला स्वतःला अर्थातच आनंदाची वाटते. उदयोन्मुख कवींना मुक्तछंदाचें माध्यम उपयोगी, भाववाहक व सौंदर्यपूर्ण वाटतें ह्यांतच त्याचें सार्थक आहे. ‘ मीनाक्षी ’ ( २४ ) ही निकुम्बांची कविता एका व्यक्तित्वपूर्ण भावनेंतून, प्रेमविषयक दृष्टिकोनांतून निर्माण झालेली आहे. त्या कवितेंतील कल्पनाही नवोन्मेषशाली आहेत.

काल सहजींच
तुझिया दृष्टीला मिळाली दृष्टि
आणि उफाळून आली ओठांवर
आंतर सृष्टि !

..............................

वाटलें सांगून टाकावें तुला

निकुम्बांचीं प्रमगीतेंही वैशिष्टयपूर्ण आहेत. किंबहुना प्रेमाचें पार्श्वसंगीत त्यांच्या सर्वच गीतांत आहे. कोठें तें स्पष्ट ऐकूं येतें तर कोठें ध्वनित होतें. त्यांत प्रेमभावनेच्या, आशा, निराशा, मीलन, विरह, ओढ, हुरहूर ह्या सर्व गोड छटा आहेत. ' बाई ! लाजून मी गेलें ? ' ( २१ ) ह्या गीतांत

दूरदूर कोठेंतरी घुमतात गोड सूर
आणि माझ्या हृदयाला लागे येथ हुरहूर

अशी प्रेमाच्या प्रथम परिचयाची जादू दिसते. ' कां गहिवर येतो ? ' ( १२ ) ह्या कवितेंत प्रेमनिवेदनानंतर सहानुकंपाची प्रतीति न झाल्यामुळें धगधगून निवान्त झालेल्या हृदयाची खंती चटका लावणारी आहे. तूं सहवासानें माझ्या हृदयाच्या अंधारांत क्षणांत तेज फुलविशील असा प्रेमाचा विश्वास ' ये बैस जरा ' ( २२ ) ह्या कवितेंत दिसतो. ' अकारण हुरहूर ' ( २९ ) हें तर एक अत्यंत भावपूर्ण प्रेमगीत आहे. प्रीतीच्या हुरहुरीचें ' कशासाठीं अंतराची ' ( ३० ) हेंही तितकेंच हळुवार आणि ध्वनिपूर्ण असें गीत आहे.

एखाद्या प्रसंगाची उत्कट जाणीव झाली म्हणजे निकुम्बांच्या लेखणींतून उत्तम भावगीत उतरतें. ' घाल घाल पिंगा वाऱ्या ' ( २६ ) ह्या कवितेंत ही साक्ष पटते.

घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसांत
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात !

ह्या पहिल्या दोन ओळींनींच लक्ष वेधलें जातें.

' सुखी आहे पोर सांग आईच्या कानांत ' ह्या ओळींतील समजूतदारपणाचें कौतुक वाटतें तोंच मनांतला खरा भाव हळुवारपणें बाहेर पडतो.

' आई भाऊसाठीं परी मन खंतावतं ! '

ह्या कवितेंत ग्रामीण जीवनाचें सुंदर आणि वास्तव प्रतिबिंब पडलें आहे. ती साधी भोळी माहेराची ओढ, गाईच्या वासरापासून भावाच्या लडिवाळपणा-पर्यंत सर्व आठवणीभोवतीं गुंगणारी भावना व त्या भाववल्यांतून स्वाभाविक-पणें सुचणारी

> कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय
> माया माझ्यावर दाट जशी तुझी माय

ही उपमा — सारेंच आल्हाददायक आहे.

निकुम्बांनीं मोठ्या आवडीनें आणि हिरीरीनें मुक्तछंदाचा स्वीकार केला आहे. अलीकडे, त्यांना जेव्हां कांहीं विस्तारानें सांगावेंसें वाटलें किंवा एखादी भावना विशद करावीशी वाटली, तेव्हां तेव्हां त्यांनी सहजपणें व कौशल्यानें मुक्तछंदाचा उपयोग केला आहे. ही गोष्ट मला स्वतःला अर्थातच आनंदाची वाटते. उदयोन्मुख कवींना मुक्तछंदाचें माध्यम उपयोगी, भाववाहक व सौंदर्यपूर्ण वाटतें ह्यांतच त्याचें सार्थक आहे. ‘ मीनाक्षी ’ (२४) ही निकुम्बांची कविता एका व्यक्तित्वपूर्ण भावनेंतून, प्रेमविषयक दृष्टिकोनांतून निर्माण झालेली आहे. त्या कवितेंतील कल्पनाही नवोन्मेषशाली आहेत.

> काल सहजींच
> तुझिया दृष्टीला मिळाली दृष्टि
> आणि उफाळून आली ओठांवर
> आंतर सृष्टि !
>
> .................................
>
> वाटलें सांगून टाकावें तुला

अनुक्रमांक 74637
विभाग
क्रमांक 924
नों. दि. 23/9/1

दडवून जें जें ठेविलें सारें
हृदयाच्या खोल गाभाऱ्यामाजीं !

‘ शिशिर अजून संपलाहि नाहीं ’ ( ३३ ) ह्या कवितेंतील

दूरच दूर ही रेंगाळे वाट
बाजूस दोन्ही
निःस्तब्ध उभे हे निष्पर्ण वृक्ष
वाळून गेलेलीं पिवळीं पानें
तळाशीं तयांच्या........!

मध्येंच एखाद्या पिंपळावर
नवीन नाजूक पालवी दिसे
उषेच्या कोमल तळव्यापरी—
सांडलीं जीवर सायंकाळचीं
मल्लूल उन्हें !

ह्यासारख्या प्रतीतिपूर्ण व तरल वर्णनांत त्यांच्या बोलांनीं स्वाभाविकपणेंच मुक्तछंदाची साथ घेतली. ही कविता निकुम्बांच्या काव्यशक्तीची व प्रतिभेची निःसंदिग्धपणें ग्वाही देणारी आहे. तिच्या वृत्तींत रम्य उत्कटता आहे, पण त्याबरोबरच संथपणा आहे. वर्णनांत स्पष्टपणाबरोबर नाजुकपणा व तरलता आहे. बांधणींत रेखीवपणा आहे आणि

आणिक एखाद्या पिंपळावर
नाजूक नूतन पालवी दिसे
उषेच्या कोमल तळव्यापरी !!

ह्या अखेरच्या ओळींतील नवांकुराइतकाच कोमल पण स्पष्ट आशावाद आधींच्या उदासीनतेवर अधिकच उठून दिसतो, एकंदर कवितेला परिपूर्णता आणतो.

निकुम्बांचा हा काव्यसंग्रह माझ्या मनांत त्यांच्याविषयीं मोठी आशा उत्पन्न करतो. त्यांना उत्कट संस्कारक्षम वृत्तीची देणगी आहे. त्यांचा नव्या जुन्या मराठी वाङ्मयाचा व्यासंग चालू आहे. इतरही विचारक्षेत्रांचा व वाङ्मयाचा व्यासंग चालू राहील असें उच्च शिक्षण त्यांना लाभलें आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचा सहजपणें विकास होऊन आजच्या युगाच्या भावजीवनाचें चिरस्मरणीय प्रतीक होऊन राहील असें काव्य त्यांच्याकडून निर्माण होईल असा विश्वास मला कां न वाटावा ? आजकाल बऱ्यावाईट सर्व तऱ्हेच्या काव्यचर्चेमध्यें एक असा स्वर निघत असतो, कीं ज्यामुळें कोणत्याही उदयोन्मुख कवीला वाटावें कीं चार दोन क्रांतिविषयक वा अन्यायाची चीड व्यक्त करणाऱ्या, रक्ताळलेल्या कविता लिहिल्याखेरीज आपला 'कवि' ह्या शब्दावर हक्कच पोचणार नाहीं. अशा गैरसमजुतीनें 'क्रांति' तर दूरच राहाते पण पुष्कळदा कवीच्या हातून आपल्या स्वतःच्या प्रत्ययाशीं प्रतारणा मात्र होते. कविमन जिवंत असेल तर भोवतालच्या परिस्थितीचा, विचारचक्रांचा, कल्लोळांचा संस्कार त्यावर झाल्याशिवाय राहाणार नाहीं हें निर्विवाद; परंतु हें स्वाभाविकपणें, जवळजवळ अभावितपणें होणेंच इष्ट ! कवीला स्वतःला देखील आपल्या काव्यशक्तीला अमुक एका वाटेनें वळविणें शक्य नाहीं. त्यानें तसा प्रयत्न केल्यास, तसा 'हठयोग' आरंभिल्यास तो योग कवित्वावरच उलटण्याचा संभव. जीवनाच्या एखाद्या अवस्थेंत, त्याच्या भावना स्वयंनिष्ठ असल्या तरीही त्याला तीच वृत्ति व्यक्त करण्याखेरीज गत्यंतर नसतें. त्याला करतां येईल तें एवढेंच: स्वतःच्या जिवंतपणाबद्दल विश्वास बाळगणें, आपल्या उत्क्रांतिक्षमतेवर श्रद्धा ठेवणें आणि आपल्या विचाराच्या विकासाचें अखंडत्व कायम राखणें. त्याच्या व्यक्तित्वाचा जसजसा विकास होईल, तसतसें

स्वाभाविकपणेंच त्याच्या प्रतिभेचें स्वरूप बदलेल. ती उत्क्रान्त होईल. व्यक्तिप्रेमाचें वलय विस्तार पावून विश्वप्रेमाचें वलय होईल. त्या प्रतिभेला केवळ विशिष्ट प्रकारच्या सौंदर्यसमाधीचा हव्यास राहाणार नाहीं. ओजस्वी ध्येयनिष्ठेची प्रखरताही तिच्यामध्यें चमकूं लागेल.

कांहीं काव्याच्या कळ्या खुलायला बराच काळ लागतो परंतु पुष्कळदा त्याच चिरंजीव होतात. निकुम्ब ह्यांच्या हातून असें चिरंजीव काव्य निर्माण होईल अशी मला फार आशा वाटते.

आत्माराम रावजी देशपांडे

८८ पश्चिम उद्यान मार्ग,
धनतोली, नागपूर
११ – ९ – १९४४

★

## ऋण

माझ्या स्फुट कवितांचा हा पहिलाच सङ्ग्रह हातावेगळा करतांना अनेक सुखदुःखाच्या भावनांनीं हृदय उचम्बळून येत आहे, पण त्यांतहि अत्यन्त उत्कटतेनें उसळून येणारी कोठली भावना असेल, तर ती कृतज्ञतेचीच होय !

अगदीं पहिली-वहिली कविता मीं लिहिली, तेव्हांपासून तों आज या स्वरूपांत ती प्रगट होईपर्यन्त, किती तरी सुहृदांनीं, हितचिन्तकांनीं तिच्याबद्दल आपुलकी बाळगली, तिची योग्य जोपासना व्हावी म्हणून सकारण-अकारण श्रम केले, तिच्या बऱ्यावाईट स्वरूपाचा अभिमान धरला, त्या सगळ्यांचीच आज उत्कटतेनें आठवण होत आहे—

—त्यांच्याबद्दलच्या भावनांना शब्दता मात्र देतां येत नाहीं.

—माझ्या कवितेचें हें आजचें प्रगटन बघून, त्यांना थोडें तरी समाधान लाभलें, म्हणजे झालें !

—कृ. ब. निकुम्ब

१६४४, नाशिक
१८-१-१९४५

★

# पान—साखळी


१ प्रसाद-चिन्हें १
२ आगमन २
३ कशी येशील ? ३
४ समाधान ५
५ रुबाया ६
६ भविष्यकाला ९
७ उजळूं द्या फुलवात १३
८ उज्ज्वले ! १४
९ सोन्याचा उम्बरा १५
१० मी प्राजक्ताच्या शय्येवर झोंपलों १६
११ निर्दय होउन तरि ये क्षणभर १८
१२ कां गहिंवर येती ? १९
१३ सम्भ्रम २०
१४ उध्वस्त ताज २१
१५ लेखन २२
१६ गीतिका २३
१७ मानिनी ! २५
१८ राजकन्ये ! २६
१९ पांखरा ! विशाल तुज अम्बर २७
२० तुझें ऐकलें मीं नांव २८
२१ बाई ! लाजून मी गेलें ३०
२२ ये बैस जरा ! ३१
२३ तिलोत्तमे ! ३२
२४ मीनाक्षी ! ३४
२५ लाभो जरा समाधान ! ३७
२६ घाल घाल पिङ्गा वाऱ्या ! ३९
२७ राग ? ४०
२८ दिनचर्या ४०
२९ अकारण हुरहुर ४२
३० कशासाठीं अन्तराची ४३
३१ हळू हळू येई रात ४३
३२ काहूर अन्तरिं दाटलें ४४
३३ शिशिर अजून सम्पलाहि नाहीं ४५
३४ जीवन—रेषा ४८
३५ जीवन-सौंदर्य ५०
३६ मरणार कुढुनि मी ५१
३७ राउळांत— ५४
३८ मनोरथांचें मनोगत ५५
३९ नवीं भविष्यें ५८
४० एक शङ्का ५९
४१ उन्मत्तास— ६०
४२ जीवन्मृताचें शिणतों जिणें मी ! ६४
४३ भैरवी सम्पल्यावर ६५
४४ कणिका ६६
४५ टीकाकारांस— ६९
४६ वैशाखींचें ऊन ७०
४७ ज्ञानेशा ! ७२
टीपा ७४


★

६५१४

## १ प्रसाद-चिन्हें !

जाति : लीलारति

प्राजक्त न फुलला माझ्या परसामधें
दरवळून गेलें गन्धानें मन तरी !
नच आळविला कुणि दीप-राग भोंवतीं
परि दिव्य फांकला प्रकाश माझ्या उरीं !
हा नदी-किनारा स्तब्ध, न वेणु-स्वन–
हुरहूर लागली तरी जिवाला कशी ?
भवतीं न कुणी; ना स्पर्श कुणाचा मुळीं–
रोमाञ्चुनि जावी कां मग काया अशी ?

या निराशल्या मम जीवन-मार्गावर
आशेच्या येती कोठुनि या चाहुली ?
–मम ‘ श्रेय ’ होउनी प्रसन्न, ये मजकडे–
हीं प्रसाद-चिन्हें त्याचीं वा उमटलीं ?

२६–३–४३
नाशिक

## २ आगमन

जाति : मुद्रिका

लागले आपुले चरण आज ह्या घरा
स्पर्शानें अपुल्या झाला सोन्याचा हा उम्बरा !

तरळतां इथें नि:श्वास मधुर आपुले
बावल्या कळ्यांचीं झालीं निमिषांत गोजिरीं फुलें !

पसरतां सौम्यशी स्मित-प्रभा आपुली
या चिऱ्यांतुनी स्फटिकांची चारुता विमल बिम्बली.

स्वर मधुर आपुला श्रवणीं रिघतांच कां-
मौनांतुनि मुक्त जहाल्या कोकिळा आणि सारिका ?

फळ एकच आपण सहजीं उष्टावतां-
हे वृक्षहि फलभारांनीं — नच नवल ! — वाकले अतां !

" मज तृषा लागली " — आपण जों बोललां-
तों भरुनि सुधेनें आला क्षणिं घडा कोपऱ्यांतला.

अन् टाकुनि विभवें हीं – गेलां आपण
पाहून त्याकडे राही हुरहूर जिवा लागुन !

१-११-४३
नाशिक

## ३ कशी येशील ?

जाति : दिण्डी

शिरीं बिन्दी बान्धून मालतीची
रचुनि मर्वा, केवडा केशपाशीं,
सोनचांफ्याच्या कळ्या दोन कानीं
काञ्चनाच्या कुण्डला लाजवीती !
आणि गजरे मणिबन्धिं मोगरीचे
चमेलीची त्यांतही बाहुभूषा.
गुलाबांची घालून गळां माला –
येशि उधळित निशिगन्ध-पारिजात !
परी लेउनिया असा पुष्पसाज
नको येऊं मम गृहीं गन्ध-राणी ! १

उषा शिकवी पांखरां वेद-सूक्तें,
झरा गुणगुणतो प्रीति - मन्त्र दिव्य,
बालकांच्या शब्दांत काव्य न्यारें
बोल रमणींचे – राग - रागिण्या त्या ! –
काव्य - सुन्दरता सकल यांतली ही
तुझ्या दडलेली गायिके ! गळ्यांत.
आणि सोनेरी स्वर तुझा तशांत– !
नवल नाहीं ! – जग डुले गीत-रङ्गीं. २

परी आलापित अशीं भाव-गाणीं
नको येऊं मम गृहीं गीत-राणी !

चान्दण्याचें ल्यालीस शुभ्र वस्त्र
आणि त्यांतहि जरतार तारकांची !
स्निग्ध भालीं रेखीव चन्द्रकोर
चन्द्रकान्तांचे गळां रम्य हार !
पदीं पैञ्जण चन्देर तुषारांचे
तुझ्या श्वासें अन् फुलत रात-राणी.
देत ललकारी चालला चकोर :
" येइ ज्योत्स्ना ही – हिला वाट द्या हो ! "
परी लेउनिया विभव हें रुपेरी–
नको येऊं मम गृहीं चान्द-राणी ! ३

क्षणीं उजळावी कृष्ण मेघमाला–
क्षणीं धरणीवर वीज कोसळावी !
लोळ तेजाचा उठावा प्रचण्ड–
दिपुन आणिक जावेत विश्व-नेत्र.
आणि तेजोगर्भांतुनी तशा त्या
–यज्ञकुण्डांतुन द्रौपदी निघाली–
तसें - अङ्गीं यावेंस लेउनी तूं –
अग्निसुमनें, भूषणें दिव्य कांहीं.
येइ ओजस्विनि ! मुक्त गृह तुला हें –
बैस जाउन निःशङ्क अन्तरांत ! ! ४

३–११–४२
नाशिक

## ४ समाधान

छन्द : देवीवर

नाहीं आपुल्या घरांत
फुललेली चान्दरात,
नसो ! पुरे ही आपणा
सोनेरी ग फुलवात !

नाहीं आपुल्या उद्यानीं
आला वसन्त भरांत,
पुरे वितरी जो गन्ध-
अङ्गणांत पारिजात !

नाहीं आपुल्या मार्गांत
आम्बराई दाटलेली,
इवल्या या झुडुपाची
पुरे दोघांना साउली !

नाहीं आपुल्या संसारीं
दिव्य अमृताचे कुम्भ,
झुळझुळता ओहळ–
शान्तवील आगडोम्ब !

–वेड आकाश-पुष्पाचें
उरीं कशाला मी धरूं ?
–आलें पदरीं भाग्यानें
त्याचा अवमान करूं ?

६-१०-४२
मालेगांव

## ५ रुबाया

जाति : भूपतिवैभव

वट-वृक्ष जाहला जीर्ण-शीर्ण हा आतां–
निःश्वास कशाला व्यर्थ असे त्या करितां ?
पारम्ब्या रुजल्या खोल जाउनी कांहीं
करितील साउली त्याच उद्यां पान्थस्थां !

तत्त्वज्ञ बोलती, " प्रतिमा-पूजन भूल,
हें विश्व पाङ्गरी नित ढोङ्गाची झूल ! "
तों हृदयप्रतिमा विस्मित-वदनें बोले :
" कां करिसी पूजन मम ? — वा ढोङ्गच ? बोल ! "

ये सुगन्ध कोठुनि झुळुकत झुळुकीसङ्गें
क्षण लोचन मिटले चित्त तरङ्गीं दङ्गे !
तों कङ्कण-रव मधु,...समोरुनी आलिस तूं !
कां सुवास होता दूत तुझाच सुरङ्गे ?

' मञ्चकीं पहुडलों कनकाच्या '—मी स्वप्नीं—
' कुणि सुर–ललना मज जागृति दे शिम्पोनी—
सित कमलांतुनि जल '—जागृतींत जों बघतों :
तूं उषाच माझी उठवित कमल–करांनीं !

घेऊन भरारी उच्च – उणें मीं गगन –
केलें; परि साहस थोर, तुरे, अवधान !
फडफडले पङ्ख नि आपटलों मी खालीं !—
क्षण तरी विहरलों नभिं हेंच समाधान !

वास्तव्य जगांतिल म्हणजे एक प्रवास
त्वत्प्रीतिगन्ध....छे ! तो रस्त्यांतिल भास !—
हें स्थानक माझें जवळ अतां बघ आलें–
मम सहचर येथुन दीर्घ दीर्घ निःश्वास !

अज्ञात-पथींचे वाटसरू चुकलेले
क्षण परस्परांच्या सोबतीस की जमले.
होऊन शान्त वा श्रान्त तिथें पुनरपि ते –
अज्ञान-पथाच्या मग्न शोधनीं झाले !

चढविले जिच्यावर वैभवशाली साज
त्या अम्बारिंत कुणि बसुनी मिरवो आज !
नभ घुमट जियेला—जगत अशी अम्बारी-
आपणच तिचे अन् मानकरी अधिराज !

जल-भरण करुनिया गृहा निघाली रमणी
कर कटिवर–घट माथ्यावर-डहुळे पाणी
मम 'जीवन-घट' हा रिता, न तुज कां दिसतो ?
घट ओतुनि तव, मज दे 'जीवन' जल-राणी !

हृदयिंचा निमाला मदीय नन्दादीप
तम पसरे आतां आंत, समोर, समीप
तरि तिमिरांतूनच 'दीप-राग' आळवुनी–
उजळाया बघतों मी दुसऱ्यांचे दीप !

१९४०–१९४१
नाशिक

★

## ६ भविष्यकाला : **

मुक्तछन्द

“ फुङ्कित तुताऱ्या, गर्जत गर्जत
साण्डित भोंवतीं सोनेरी स्वप्नें
आगळें आपुलें वैभव लेऊन
येणार कधीं तूं भविष्य-काला ? ”

उध्वस्त माझें हें जीवन आज
जीवन-द्यूतांत उलटे फांसे पडले सारे–
नेमकें आलें नि नको तें दान हातांत आतां !
पराभव आतां टळावा केवीं ?
बैसलों खेळाया जेधवां आधीं
टाकिलें जेधवां नि देव-दान

“ मीच जिङ्कणार ! ”–विश्वास तेव्हां जीवास होता ;
कर्तृत्व फुलतें पाठिशीं होतें;
आकाङ्क्षा-नृत्यानें भारलों होतों !
–मनोरथ सारे तेव्हांचे आतां–
वीरभद्रानें उत्सन्न केल्या त्या दक्ष-यज्ञासम
निष्प्रभ झाले !

तरीही कधीं स्मरण तुझें
मनास होतें भविष्य-काला !
–आणि वसन्ताची लागतां चाहूल
हेमन्तीं वठला तरूही दावितो
नाजुक, नूतन, पाचूंचे उन्मेष–

तेवींच माझें
निर्माल्य-कर्तृत्व पाहते उमलूं !
कांहीं निराळाच उत्साह फुलतो रोमरोमांत
" तूंच जिङ्कणार ! " – साङ्गतें कोणी
कानांत हळूच विश्रब्धतेनें !
म्हणून तुला ही घालणें साद :
" फुङ्कित तुताऱ्या, गर्जत गर्जत
साण्डित भोंवतीं सोनेरी स्वप्नें
आगळें आपुलें वैभव लेऊन,
–येणार कधीं तूं भविष्य-काला ? "

कितीकदां तरी—
रम्य स्वप्नापरी त्वदीय मूर्ति
तरळून जाते लोचनांपुढून,
आणि आभासांत
मन हें स्वप्नाळू राहतें गुङ्गून !

–दिसते तुझी सहास मुद्रा
फुललें जीवर जुईचें मार्दव.
जिवन्तपणाची न्यारीच झळाळी
खेळते सारखी मात्र नयनीं !
पाठीवर स्वैर लोळतो आहे केशांचा संभार
अवखळ तुझा उत्साह जणूं नाचतो त्यांतून
कण्ठांत एकच रुळते आहे
'चिन्तामण्यां'ची अद्भुत माला.

ल्यालास अङ्गीं वस्त्र हें आगळें
इन्द्रधनूच्या कोवळ्या तन्तूंची गुम्फण त्याची
आणिक त्यावर केलेली दिसे
जीवनरसाची किमया कांहीं !
–सहस्र हस्तांचे करिसी विन्यास शङ्करापरी
परी न तयांत रुद्रता कांहीं
सारें स्निग्धच, स्नेहल, सुन्दर !
–शोभतो आहे हातांत, उत्तुङ्ग
श्वेत-मङ्गल हा विजय-ध्वज
फडकतो आहे
वाऱ्यावर स्वैर एकसारखा
साङ्गतो जणूं गर्जून जगाला :

" जिङ्काया निघालों अवघें ब्रह्माण्ड ! "
–दिसतो स्कन्धीं अपूर्व श्रेयांचा विराट घट
आशांचीं पांखरें करीती कूजन
भोंवतीं जयाच्या उत्सुकतेनें !

–अनन्त-पथावरून असा
निःशङ्कपणें चालतो आहेस भविष्य-काला !
मनीं मानसीं कितिकदां तरी
स्वरूप तुझें हें
देतें उधळून दिलासा-विसांवा !
क्षणभर होतें शान्त होमकुण्ड आंतलें जळतें
क्षणभर होतें ह्रदय समृद्ध !
म्हणून लालसा तुझिया भेटीची—
म्हणून उत्सुक तुझिया दर्शना–

म्हणून घालणें तुजला साद :
" फुल्कित तुताऱ्या, गर्जत गर्जत
साण्डित भोंवतीं सोनेरी स्वप्नें
आगळें आपुलें वैभव लेऊन,
येणार कधीं तूं भविष्य-काला ? "

२०-१-४०
नाशिक

## ७ उजळूं द्या फुलवात !

छन्द : देवीवर

जेथें वाळू-रणीं झाले
जीव तृषार्त, व्याकूळ,
तेथें होऊं द्या हो, रिती–
माझी अश्रूंची ओंझळ

जीविताच्या कोलाहलीं
जन जाहले हैराण,
माझ्या जीवन-गीताची
तेथें घमूं द्या हो, तान !

हिम-वर्षावांत जेथें–
नाहीं पांखरा निवारा,
उरीं होम-कुण्ड माझ्या
त्याचा मिळूं द्या उबारा !

प्रकाश घे उडी जेथें
काजळाच्या सागरांत,
प्रभु, क्षण तेथें माझी
उजळूं द्या फुलवात !

मानव्याच्या संरक्षणीं
चाले जेथें घोर रण,
तेथें माझे ओवाळून
टाकूं द्या हो, पञ्च-प्राण !

४–६–४२
नाशिक

## ८ उज्ज्वले !

जाति : पादाकुलक

उजळित येई भुवन उज्ज्वले !
तमोभ्रष्ट या नौकेवर झणिं–फुलवि दीप, तव वेध लागले !

मार्तण्डाची तूं निःश्वसिता
रुद्र असे वा तुझा विधाता
चन्द्रानें वा रचिली कविता
शान्ति, प्रखरपण तव हृदिं भरलें !

अमर दीप्तिमय वलयें निर्मुन
घन तमिं उधळून - चरांचरांतुन
मधु-मासापरि जीवन फुलवुन
सजवित ये संसार भङ्गले ! –

विश्वसदन हें आज तमोमय
–सत्तान्धाचें जणुं न्यायालय–
–तव हास्यें फुटतिल अरुणोदय !
पावन करि जग त्वरित मङ्गले !

द्युति-मय घडतां पद-स्पर्श तव
तमःशिळेंतुन 'तेजोवैभव'
अहल्येपरी प्रगटुन; अभिनव
तेजःस्वर आळविल आपुले !
उजळित येई भुवन उज्ज्वले !

२२–४–४२
नाशिक

## ९ सोन्याचा उम्बरा !

जाति : पद्मिनी

सोन्याचा उम्बरा
तुझा तर सोन्याचा उम्बरा !

सर्वे घेउनी व्रज नर-नारी
अभिनव मुरली धरुनी अधरीं
हरिनें काञ्चन-पुरी उभविली
सोनेरी ती काय लाभली किमया तव मन्दिरा ?

रत्न-दीप तव गृहीं उजळिले
मधु-शीतल सुम-गन्ध दाटले !
इन्द्र-नील तर वितानीं खुले,
आणि तुझ्या अङ्गणांत फुलला मोत्यांचा फुलवरा

अपूर्व वैभव आंत शोभतें
सौन्दर्यहि त्यांतून विनटते
स्वर्ण-स्वर गीतांचे फुलते !
काय अशा या भवनीं रमते ती साक्षात् इन्दिरा ?

–एकलेंच तव असलें घरकुल
विशाल पसरे भंवतीं भूतल
ज्यांत माजला घन कोलाहल
बाहेरीं ये, पहा जरा रे ! ही ‘बहु-रत्ना धरा’ !

ऐक जरा हें करुणाक्रन्दन
जळत्या हृदयांचें हें स्पन्दन
–असें भाकरीकरितां हें रण !
निज विभवाची जडेल आणिक खन्त तुझ्या अन्तरा !

विशाल करि तव सुवर्ण-मन्दिर
वसुधा होवो त्याचा परिसर
सुख-शान्तीचे वर्षू दे सर ! –
करिन तुझ्या देहलीवर नत माथा, जोडुनि करां–
तुझा तर सोन्याचा उम्बरा !

६–८–४२
नाशिक

★

## १० मी प्राजक्ताच्या शय्येवर झोंपलों ! :२*

जाति : लीलारति

मी प्राजक्ताच्या शय्येवर झोंपलों
निशिगन्ध, मालती, चमेलींत नाहलों
सामर्थ्य मात्र कधिं यावें–वाञ्छा तरी–
झेलाया सहजीं उल्का-पुष्पें शिरीं !

मीं ललनांचे मृदु पदन्यास पाहिले
मन निर्झर-लास्यीं कितिदां लोभावलें
ये प्रदोष-समयीं तरिहि कधीं आठव :
रुद्राचें बघणें विराट तें ताण्डव !

मी विहगांसह विहरलों नभोमन्दिरीं
कोकिळेसवें सेविली आम्रमञ्जिरी
तरि कधीं मनीं ये : सप्त-स्वर्गांतुनी
गरुडापरि अमृत आणावें जिङ्कुनी !

'शर अमोघ याचा !'–जन मजला वानिती
'मी श्रेष्ठ धनुर्धर !'–मजहि अहन्ता किती !
टोंचणी जिवा तरि : अजून आहे उणें
प्रत्यञ्चा नच कां शिव-धनुला जोडणें ?

मृग-शुक्र लाजले मम सुषमा पाहुनी
रुचिहीन जाहली अन् शशिची वारुणी
परि नच ही प्रतिभा विभूति मम शोभवी
मज मार्तण्डाची ज्योतिर्मयता हवी !

३१–३–४३
नाशिक

★

## ११ निर्दय होऊन तरि ये क्षणभर

जाति : पादाकुलक

निर्दय होउन तरि ये क्षणभर–
तुझ्या कृपेला पात्र न मी जर !

कटाक्ष स्नेहल तुझा मिळाया
तप केलें मीं–गेलें वायां–
आशा–रवि अस्ताला जाउन
उरल्या आतां श्यामल छाया,
मात्र उरींचें शान्त न काहुर !

स्वप्न-रम्य रङ्गविलीं चित्रें–
स्वप्नासम तीं हाय ! विराया ?
धूसर आकृति आतां दिसती–
प्राण निमाले–उरल्या काया !
तरिहि जीव तुजसाठीं आतुर !

क्रुद्ध होउनी ये सन्तापुन,
फेंक शरापरि कटाक्ष दाहक
क्षणांत आणिक टाक काजळुन
उरले-सुरले हृदिंचे तारक....
होवो मग तें स्मशान अन्तर !

तुझ्या दृष्टिचा व्रण हृदिं राहिल,
नयन-भेटिची ती अपुल्या खुण,
उरेल केवळ तोच दिलासा–
तें तर माझें ' श्रीपदलाञ्छन ! '—
अभिमानें मिरवीन निरंतर
निर्दय होउन तरि ये क्षणभर !

१९४३
नाशिक

★

## १२ कां गहिंवर येतो ? *

जाति : भूपतिवैभव

झेंपावत अपुले विशाल काळे पङ्ख
विश्वाच्या घरट्याकडे परतली रात
– तरि पश्चिम-क्षितिजीं हासत होती सन्ध्या
आशेचीं किरणें जणुं माझ्या हृदयांत !

निर्मनुष्य होता नदी-किनारा सारा
तूं होतिस निकटीं देत जिवास उबारा
कुजबुजत चरण-तळिं होतें हिरवें पाणी
गुजगोष्टी होता हळूच साङ्गत वारा !

मम दृष्टी होती तुझिया वदनीं खिळली
तव नजर खालती सहजच होती वळली
अन् उसळुन आले माझे आन्तर भाव-
मीं ' भाव-कथा ' गे, माझी तुज साङ्गितली.

क्षण होतिस निश्चल तूं पाहत शून्यांत–
अन् मींहि कुठें तरि खिळविलिं नयनें आर्त–
मौनांत अशा क्षण अनन्त गेले निघुनी
–काजळला अन्तीं नदी-किनारा शान्त....

कित्येक लोटले त्यावर शून्य दिनान्त
धगधगून, जळुनी झालें हृदय निवान्त
–परि कधीं विजेपरि ती स्मृति चमकुनि जातां
कां गहिंवर येतो ? अन् हो कसली खन्त ?

१३–३–४२
नाशिक

★

## १३ सम्भ्रम :

सुनीत

अङ्गाङ्गांतुन चारुतामय तुझ्या ओसण्डते यौवन !
कोणाच्या तप-नाशनार्थ जगतीं आलीस तूं मेनके ?
चन्द्राची द्युति शान्त, शीतल, मुखीं तेजस्विनी शोभते
भावोल्लास-विलास नित्य खुलती नेत्रद्वयीं तूझिया.

तूं जातेस पथांतुनी, उमलते चोहींकडे चारुता,
पायीं पैञ्जण वाजतांच गमतें, गाते स्वराली स्वतां,
येतां सन्निध तूझिया कुणि, झणीं त्वद्गन्धजालीं फसे,
–तूझ्या ठायिं सुगन्ध, सुन्दरपणा, सङ्गीत एकत्र हो !

मीं केव्हांहि कृपा-कटाक्ष तव तो नापेक्षिला राजसे,
'ती राजेश्वरि - दास तूं !' शिकवणी मीं मन्मनाला दिली.
—अन् आश्चर्यच ! याचना मजकडे केलीस तूं प्रीतिची,
झालों सम्भ्रम-चित्त मी, न कळलें - स्वर्गींच वा भूवर !

मीं—कां तें न कळे !-परन्तु तुज ना स्वीकारलें देवते !
पश्चात्ताप न होय !—मात्र नच गे, माझ्या जिवा शान्तता !

२८-४-४०
नाशिक

## १४ उध्वस्त ताज :

गज्जल : वारुणी

तूं नि मी होतों तदा सीमेवरी गे, यौवनाच्या
तूझिया ठायीं जडे गे, भाव माझ्या अन्तरींचा !
शब्दता द्याया तयाला धीर ना झाला परन्तु—
भङ्गला अन् हाय ! माझ्या आस आकाङ्क्षा-रथाचा !

स्वप्न तें सम्पून गेलें—विस्मृति ये त्या स्मृतीला—
जीव संसारांत या अन् आजला रङ्गून गेला.
"प्रीत ना ती—मोहिनी रे !" कोरिलें मन्मानसीं मीं
रञ्जवीती रम्य आतां 'श्याम'च्या निर्व्याज लीला !

वत्सरें गेलीं किती—अन् आज तूझी भेट झाली,
हांसरी चर्या तुझी होती जरा कोमेजलेली !
—थोपटीतां बाळ स्कन्धीं तूं म्हणाली आर्ततेनें—
"रे ! तुझ्या ठायींच होती प्रीत माझी भाव-भोळी !"

६६२८

तत्क्षणीं आन्दोलुनी मद्वृत्ति साऱ्या स्तब्ध झाल्या !
आणि दृष्टिक्षेप तूझा अन्तरा विन्धून गेला !
मद्-हृदीं कां वार केला-गूज खोलुनी तुझें तूं ?
—ताज माझ्या शान्तिचा गे, येथुनी उध्वस्त झाला !

१५–७–४२
नाशिक

☆

## १५ लेखन !

सुनीत

'श्री ग ऽ' हा पहिला धडा गिरविण्या होतीस तूं बैसली
पाहूनी हंसलीस अल्लडपणें तैं गोड माझ्याकडे
डोळे मिस्किल नाचरे–झुळकत्या भालीं बटा नाजुक
भासे कीं, सुर-बालिका कुणि करी भोतीं सुधा-सिञ्चन !

आतां यौवन-मञ्जरी विसरसी काव्यीं स्वतांलाच तूं.
काव्यालेखनिं मग्न मूर्ति तव ती सानन्द मी पाहतों–
तूझा नाजुक केशभार रुळतो पाठीवरी रेशमी
वा ! ही बैठक ऐटदार जणुं तूं प्रत्यक्ष वागीश्वरी !

हातांतून तुझ्या गमे, उतरती ह्या मौक्तिकांच्या सरी–
चाले ही तव लेखणी झरझरा साहित्य-निस्यन्दिनी !
प्रज्ञेचें मधु-शान्त तेज वदनीं मेधावती ! राजतें;
पृथ्वीला प्रतिभा-विलास तव गे, स्वर्गीय दे चारुता !

तूं माझी प्रिय लेखिका—तव गडे ! मी लाडका वाचक !
मद्भालीं परि ' भाग्यलेख ' ललिते ! केव्हां लिहीणार तूं ?

१७-४-४०
नाशिक

★

## १६ गीतिका :*

### १ चाहुल ?

जाति : पद्म

आस पालवे—
चाहुल आली !
भास निमाला,
घाव कपाळीं !

### १ ओठ आणि डोळे

जाति : पादाकुलक

ओठ: " असून वाणी—मुकेच आम्ही
रहस्य बोलूं न अन्तरींचें ! "
डोळे: " नसो गिरा—बोलके परन्तु
क्षणांत खोलूं गूज मनींचें ! "

## ३ लीला !

जाति : पादाकुलक

तुझ्याच लीला
प्रसन्नतेला–
सौख्य–देवते, कारण झाल्या !
तुझीच लीला
एकचञ्चला–
आशा अदये ! पार निमाल्या !

## ४ ज्योत

जाति : पादाकुलक

हळूच झुळुकत आला वारा—
मन्द मन्द ही वात तेवते !
तसाच नकळत गेला वारा–
ज्योत अनन्तीं विलीन होते !

★

## १७ मानिनी !

गझल : आनन्दकन्द

मानी स्वभाव माझा साक्षात मानिनी तूं !-
संसारिं मान-हानी. होईल कां परन्तु ?
तेजांत तेज येतां- वाढेल दिव्य दीप्ति ?
वा 'लोळ' होउनीया जाळील जीव-जन्तु ?
'विद्युल्लता-द्वयाच्या सम्मीलनीं जलाची
समृद्धि मात्र व्हावी व्हावा न स्फोट किन्तु !'
-आशा अशा सुखाची चित्तांत बाळगून
हातीं दिलास माझ्या निज हात रेशमी तूं !

-व्हावें न, तेंच झालें कल्लोळ माजला अन्
वागस्त्र पाजळूनी निःशङ्क फेंकिलें तूं-
रोमांत मान माझा मानीपणाच प्राण-
केलेस मानिनी ! कां तूं दग्ध मान-तन्तु ?
वाक्ताडणीं तुलाही ना मानिलें मुळीं मीं !
गेलीस सोडुनीयां कैलास शैलजे ! तूं.
-डौलांत ऐटदार परि टाकतां पदांना,
किञ्चित् वळून मागें कां पाहिलेस गे, तूं ?
नेत्रांत अश्रु-बिन्दु अन् भावचन्द्रिका कां ?
व्याकूळ मीहि झालों; "ईशः शुभं करोतु !"

–गेलीस तूं निघूनी हा लाभ ? मान ? हानी ?
अश्रूंत चिम्ब झाली माझी उशी परन्तु !

१९३८
नाशिक

★

## १८ राजकन्ये !

गझल : पाण्डव

होउनी आलों भिकारी तूझिया द्वारीं कधीं–
काञ्चनाच्या बैसली होतीस तूं सिंहासनीं
चामरें तूझ्यावरी ढाळीत होत्या सेविका
वैभवें सेवेस होतीं भोंवतालीं आगळीं.

" जिङ्किलें साऱ्या जगा मीं–" तूझिया मुद्रेवरी
भाव हा दाटून होता राहिला गे, मानिनी !
हावभावांतून होती गे, अहन्ता साण्डत–
लोचनीं मानीपणाची ज्योत होती तेवती !

दृष्टिपातें जिङ्किलें एकाच तूंतें मीं परी–
भूवरी दृष्टी खिळोनी सारखी गेली तुझी
–की तुझा मानीपणा पोटांत भू सीतेपरी
घेइ—न्याहाळीत होती तूं अहन्तेचा बळी !

मी विजेता – वृत्ति माझ्या हर्षल्या, आनन्दल्या
गोड स्वप्नांच्या जगीं अन् जीव गेला रङ्गुनी !
बोलली तूझी गिरा तों : "न्या तया कारागृहीं !"
–आणि बन्दी मी तुझा गे, जाहलों अन्य क्षणीं.

रम्य तूझ्या अन्तरीं झाल्या न कां संवेदना ?
कां उदेली प्रीत ना ? – कीं ही अहन्तेची 'कला' ?
–अन् करी मी ह्या तमाला प्रश्न वारंवार गे :
" जिङ्किलें चित्ता तिच्या मीं 'काय हा माझा गुन्हा' ? "

१६–५–४२
नाशिक

★

## १९ पांखरा ! विशाल तुज अम्बर !

जाति : सूर्यकान्त

जातां-येतां तुझीं उमटलीं इथें कधीं पाउलें
–पुष्प-परागांहून धूलि-कण मज हे प्रिय जाहले !
जातां येतां सोडिलीस तूं लकेर वाऱ्यावर
–सङ्गीतानें नव्हतें केलें असें कधीं आतुर.
जातां-येतां गन्ध तरळला तुझिया श्वासांतुनी
–आंत आंत हुरहुर लागली, उर आला दाटुनी !
जातां-येतां चुकुन कधिं तरी दृष्टिभेट जाहली
–पिसापरी तनु तरल होउनी नभिं तरळूं लागली.

कधीं न केला धीर – न कधीं मी तव सन्मुख जाहलें
ओठावरलें अधुरें गीत न कधिंही केलें पुरें
तुझ्या सुवासावरी धुन्द मीं फुलें न कधिं माळिलीं
नयन-भेट निमिषाची; स्थिर नच नजर कधीं जाहली !

तुला न परि जाणीव कशाची ! रानपांखरापरी–
तुझ्या जिवाचें राज्य चालतें तुझिया लहरीवरी !
अनिर्बन्ध गेलास निघुन तूं खुशाल देशान्तरा
विद्ध सावजापरि मी व्याकुल – लागे शर अन्तरा !

केश गुम्फुनी चतुरपणें मी आज फुलें माळिलीं–
–नयन-भेटिची स्वप्न-मालिका मनिं तरळूं लागली !–
करुन मोकळा गळा, पञ्चमांतले सूर लावले
मुक्तबन्ध हिण्डतें उमटलीं जिथें तुझीं पावलें !
–आणि गीत-रागामधिं मम त्या एक जीवन-स्वर :
" अबोल मज मत्प्रीत, पांखरा ! विशाल तुज अम्बर ! "

४–६–४३
नाशिक

★

## २० तुझें ऐकलें मीं नांव ! :२*

छंद : देवीवर

कधीं तरी कुठें तरी तुझें ऐकलें मीं नांव
नकळत तुझ्या ठायीं जडला नी स्नेहभाव
दृष्टि-भेटही न परी झाली कधींच आपुली
हृदयांची देवघेव मग व्हायची कुठली ?
मात्र तुझें नांव कधीं सहजींहि येतां कानीं
माझ्या अन्तरीं सुखाच्या कळ्या येती बहरूनी !

दिवसाचा व्याप सारा   सम्पवून, शेजेवर–
देह टाकतां हो जागें   तुझ्या आठवें अन्तर–
कल्पनेच्या शलाकेनें   मग वेडें किती वेळ
स्वप्न-चित्रांचीं रेखीत   बसे भाव-रम्य ओळ !
कळतें न मग कधीं–   ' निद्रा ' हळूच येऊन–
मृदु नाजुक ओठांनीं   जाई पापण्या चुम्बून ?

आणि कधीं पहाटेस   येई अवचित जाग–
पश्चिमेस साण्डी शुक्र   दिव्या कान्तिचे पराग– !
क्षणभर तेथें माझी   जाई नजर खिळून
तोंच तुझी स्मृति मनीं   येई वेगें उसळून !–
उल्लासाच्या आणि हृदीं   स्वर-माला घुमतात
शिरशिरीमधें त्याच   होई अखेर दिनान्त !

*   *   *

कधीं हुरहुर वाटे :   कधीं व्हावयाची भेट ?
कधीं कल्पना-चित्रांना   रूप यावयाचें मूर्त ?
आतुरल्या नयनांचें   कोड कधीं पुरायचें ?
शब्दातीत वैखरीनें   गूज कधीं बोलायचें ?
आतां केधवां व्हायचें   जीवित हें ' धन्य धन्य ' ?
–दर्शनाचें वरदान   द्यावें – साद ही अनन्य !

नको परी-कधीं-कुठें   तुझें नांव मीं ऐकलें
त्याच्यावर कल्पनेचे   साज सारे चढविले !

आतां जर प्रत्यक्षांत भङ्गल्या त्या स्वप्न-मूर्ति
घात सगळा ! येईल मज मृत्यूची प्रचिती !
नको परीक्षा विषाची असो कांहीं सत्यासत्य !
भोगीन मी अज्ञानाचें भोळें सुख तरी नित्य ! !

१५-५-४२
नाशिक

★

## २१ बाई ! लाजून मी गेलें !

छन्द : देवीवर

दूर दूर कुठें तरी
घुमतात गोड सूर
आणि माझ्या हृदयाला
लागे येथ हुरहूर !

दूर दूर कुठें तरी
कुणी उधळितें गन्ध
सुवासानें मात्र माझें
येथें हृदय हो धुन्द !

दूर दूर कुठें तरी
चान्दण्याचा मेघ वोळे
दाह-दुःख अन्तरींचें
येथें माझें शान्त झालें

दूर कुणी विलासांत
इन्द्रधनुष्याचे रङ्ग
साण्डी, माझिया हृदयीं
त्याचे दाटले तरङ्ग !

दूर दूर आणि कुणी
'गोड गूज' उच्चारिलें–
वाऱ्यासङ्गें येतां कानीं
बाई ! लाजून मी गेलें ! !

१९४३
नाशिक

## २२ ये बैस जरा !

जाति : महात्मवती

ये बैस जरा ! मज घे अपुल्या करपाशीं
गुजगोष्टी करुं दे क्षण हृदया हृदयाशीं !
"सार तूं जरा मम कर्तृत्वाची ज्योत,
जिङ्कीन निश्चयें विश्वें सहज अनन्त...."
–साङ्गितला होता तुज हृदयींचा हेत !
–करि व्याकुल आज उदासी !
सोडीत उसासे आज बैसतों नित्य,
जिङ्किन गगन परतल्या पांखरां बघत
अन् बघतां बघतां ये गहिंवरुनी चित्त
परि राही हृदय उपाशी !

हळु अतां धरेला गिळूं लागला तिमिर
स्वर्गाचें मिटलें कुणि सोनेरी द्वार !
—पुसतेस काय ?—मम हृदि नित्यच अन्धार-
क्षण फुलव तेज सहवासीं !
ये बैस जरा ! मज घे अपुल्या करपाशीं !

९–७–४२
नाशिक,

★

## २३ तिलोत्तमे !

जाति : शुभवदना.

सौन्दर्यें सकल तुझ्या ठायिं एक झालीं !
इन्दु-किरण नयनांतुन
हळुच बघति डोकावुन
श्वासांतुन पसरे तव, गन्ध भोंवतालीं.
अलक-भार कृष्ण, कुरल
नजर तुझी तेज, तरल
आणि उषेनें तुजला चुम्बिलें कपोलीं.
नाजुक रेखीव भाङ्ग
सहज चित्त करिल दङ्ग
शुभ मङ्गल-बिम्ब त्यांत रेखिलेस भालीं.
करिसी मधुर मन्द-स्मित
जादू अभिनव अद्‌भुत—
व्याध-शुक्र कर्ण-भूषणें तुझीं जहालीं.

जें जें मधु-सुन्दर, ऋण—
तिळ तिळ त्यांतुन घेउन
ही अपूर्व रम्य तुझी मूर्त घडवियेली !

लय-निबद्ध चरण-चाल
नूपुरपदिं-धरित ताल
नृत्य-कला नाग-नृत्य करित करित आली !

बहरुनि ये यौवन-तरु
लागला सुवास वितरुं
धुन्द करित पुरुष-मनें सहज तूं निघाली !

तूं अबला—तरि प्रबला
जिङ्किलेंस प्रबल खला
दुष्टांच्या अचुक घाव घातला कपाळीं !

*     *     *

प्रगटुनी पुन्हा भुवनीं
उन्मत्ता मोहवुनी—
नाशुनि; करि विश्व सकल पूर्ण सौख्यशाली !

३१-५-३४
नाशिक

★

हळु अतां धरेला गिळूं लागला तिमिर
स्वर्गाचें मिटलें कुणि सोनेरी द्वार !
—पुसतेस काय ?—मम हृदि निव्यच अन्धार-
क्षण फुलव तेज सहवासीं !
ये बैस जरा ! मज घे अपुल्या करपाशीं !

९–७–४२
नाशिक,

★

## २३ तिलोत्तमे !

जाति : शुभवदना.

सौन्दर्यें सकल तुझ्या ठायिं एक झालीं !
इन्दु-किरण नयनांतुन
हळुच बघति डोकावुन
श्वासांतुन पसरे तव, गन्ध भोंवतालीं.
अलक-भार कृष्ण, कुरल
नजर तुझी तेज, तरल
आणि उषेनें तुजला चुम्बिलें कपोलीं.
नाजुक रेखीव भाङ्ग
सहज चित्त करिल दङ्ग
शुभ मङ्गल-बिम्ब त्यांत रेखिलेस भालीं.
करिसी मधुर मन्द-स्मित
जादू अभिनव अद्‌भुत—
व्याध-शुक्र कर्ण-भूषणें तुझीं जहालीं.

जें जें मधु-सुन्दर, ऋण—
तिळ तिळ त्यांतुन घेउन
ही अपूर्व रम्य तुझी मूर्त घडवियेली !

लय-निबद्ध चरण-चाल
नूपुरपदिं-धरित ताल
नृत्य-कला नाग-नृत्य करित करित आली

बहरुनि ये यौवन-तरु
लागला सुवास वितरूं
धुन्द करित पुरुष-मनें सहज तूं निघाली !

तूं अबला—तरि प्रबला
जिङ्किलेंस प्रबल खला
दुष्टांच्या अचुक घाव घातला कपाळीं !

* * *

प्रगटुनी पुन्हा भुवनीं
उन्मत्ता मोहवुनी—
नाशुनि; करि विश्व सकल पूर्ण सौख्यशाली !

३१-५-३४
नाशिक

★

अनुक्रमांक ७५६३२
विभाग ...
क्रमांक ९२८
नों. दि. २३/७/५५

## २४ मीनाक्षी ! *

मुक्त - छन्द

जादुगारिणी !
कधींहि पुन्हां
नकोस खिळवूं माझिया नयनीं
तुझे ते अथाङ्ग भावुक डोळे !
असीम स्नेहाची शीतल कान्ति
हळुच-जपून
टाकिते आपुलें राजस पाऊल
तुझिया लोचन-मन्दिरामधें
आणिक आपुल्या कोमल हास्यें
देते विखरून
प्रकाश तरङ्ग प्रीतिचे तेथें !
—आगळीच कांहीं गूढरम्यता खेळते तयांत !
नील-नयने !
निर्मल नभींचा नीलिमा प्राशून
चान्दणेंच काय दडलें तुझिया नयनीं रम्य ?
—साण्डतां तुझिया दृष्टीचा स्रोत :
भरास येईल वठला प्राजक्त,
क्षणीं फुलतील मरु-भूवरती मोत्यांचे मळे,
ताजमहालाच्या सौन्दर्यप्रभेनें
नटतील आणि भग्न अवशेष !

आवर्जून तरी साङ्गणें तुला :
“ जादुगारिणी !
कधींहि पुन्हा
नकोस खिळवूं माझिया नयनीं
तुझे ते अथाङ्ग भावुक डोळे ! ”

काल सहजींच तुझिया दृष्टीला मिळाली दृष्टि
—आणि उफाळून आली ओठांवर आन्तर सृष्टि !
पार्थानें पाताळीं सोडिला शर—
निमिषांत आणि पाताळगङ्गेचा
प्रवाह खेंचून आणला वर–
कटाक्ष त्वदीय
शिरला तेवींच अन्तरीं माझ्या–
आणिक तयानें आणिलीं खेंचून क्षणांत वर
माझिया जीविंचीं रहस्यें सारीं !
वाटलें: सांगून टाकावें तुला
दडवून जें जें ठेविलें सारें
हृदयाच्या खोल गाभाऱ्यामाजीं !
जयाचें स्मरण–
स्वतांशींच मात्र करितों कधीं मी एकान्त जागीं !
—मानापमानांचे कितीक प्रसङ्ग
विफल झालेले उत्तुङ्ग सङ्कल्प
पांखरापरी उडून गेलेल्या सुसंधि कांहीं

आशांच्या भुतांचें स्वैर बरळणें
उरांत झालेल्या जखमा खोल
आणि उन्मत्तांच्या अपूर्व ‘ जादू ’ नें
वठला माझा जीवन-तरु–
वाळला पाचोळा उरला तयाचा अजून जो, तो!
–किंवा गौरवाचे चार-दोन क्षण
लाखांच्या मोलाच्या आठवणी कांहीं
कधीं साण्डलेलीं स्नेहल आंसवें

वात्सल्याचा कधीं फिरलेला हात पाठीवरती–
पडसादावीण राहिलेली वा अनुक्त प्रीति....
—सारें हें आहे वैभव माझें पवित्र अमोल
भग्न जीवनांत माझिया आतां विसांवा हाच !
बोलून गेलों मी चुकून जरी हीं जीवनसूक्तें
असह्य होईल मज तें केवळ दुसऱ्या क्षणीं
असाध्य जखम होईल माझिया मानी जीवाला—
मरणापरि नि गमेल जीवन !

काल वारंवार तुझिया दृष्टीनें
गुन्तविलें मज पाशांत आपुल्या
उद्युक्त केलें अन् साङ्गाया मज हीं जीवन-गूजें—
परन्तु लावून पणास मदीय—
उरली–सुरली संयम शक्ति
थोर प्रयासांनीं—
बन्दिस्त केली मीं वैखरी माझी !

—मात्र आतां नसे भरंवसा मज
माझिया दुबळ्या संयम-शक्तिचा !—
विराट वादळीं झगडून तारु
मोडून-तोडून
यावें कसें तरी किनाऱ्यावर—

झगडून काल तेवींच झालें
संयम-सामर्थ्य निःसत्त्व माझें !
दृष्टीला आतां भिडतां दृष्टि
अशक्य होईल थोपविणें मज भावनोद्रेक :
आणिक नको तें क्षणीं अवचित जाईल होऊन !
म्हणून मीनाक्षी ! आर्जव तुझे :
" झालें तें झालें !
कधींहि पुन्हा
नकोस खिळवूं माझिया नयनीं
तुझे ते अथाङ्ग भावुक डोळे !"

२५-४-४३
नाशिक

★

## २५ लाभो जरा समाधान ! :

छंद : देवीवर

माझ्या वठल्या तरूला तूंच घातलें जीवन
रस हृदींचे शिम्पून केलें तूंच सङ्गोपन.
सदा जागता पहारा पञ्चप्राणांचा भोंवतीं
किती दिस गेले असे किती उलटल्या राती !

—आणि आज पालवला मोहरला माझा तरु
कळी-कळी उमलली गन्ध लागली वितरूं !
—हाय ! सुवास लुटाया नाहींस तूं तरु-तळीं
खिन्न झाली म्हणूनीया माझी पाकळी-पाकळी !

रात्रन्दिन स्वप्न गोड मनीं तुझ्या तरळलें :
'माझ्या तरूला पाचूंचे नव-पल्लव फुटले
मोतीं-माणिकांचे घोंस ठायीं ठायीं लटकले
हिरकणीचे त्यांतून चमकती नव कळे,
आणि साऊली तळीं, छे ! नील-मणि उधळले
नवल हें !—रत्नांचे ह्या गन्ध चौफेर दाटले !'
—आज सोन्याचा दिस, तें स्वप्न झालें सत्यरूप
नाहींस तूं पहायाला नाहीं जिवाला हुरूप !

पानें-फुलें आतां कोणी नेती रोज पूजनाला,
सुमनांचा माझ्या कोणी देती पुण्यवन्ता झेला,
कधीं भोंवतीं तापतां वैशाखींचे तीव्र ऊन
येती साऊलीला पान्थ, गुरें-वासरें, धावून !
आणि फान्दी फान्दीवर पांखरांचें राज्य चाले,
स्तोत्रें ऐकूनीया त्यांचीं प्राण पुलकित झाले.
—जीवनाच्या सार्थकाची कधीं जिवा हो जाणीव
तोंच तुझिया स्मिताची जांचे हृदया उणीव !

आणि एक वाटे जिवा : इतिहास हा ऐकून
असशील तेथें तुला लाभो जरा समाधान !

२–७–४२
नाशीक

## २६ घाल घाल पिङ्गा वाऱ्या !

छन्द : लवंगलता

घाल घाल पिङ्गा वाऱ्या, माझ्या परसांत
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात !
"सुखी आहे पोर"–साङ्ग आईच्या कानांत–
"आई, भाऊसाठीं परी मन खन्तावतं !
विसरली कां ग ?–भादव्यांत वर्स झालं
माहेरींच्या सुखाला ग मन आंचवलं.
फिरुन् फिरुन् सय येई जीव वेडावतो
चन्द्रकळेचा ग शेव ओलाचिम्ब होतो.
काळ्या कपिलेची नन्दा खोडकर फार
हुङ्गहुङ्गूनीया करी कशी ग बेजार !
परसांत पारिजातकाचा सडा पडे
कधीं फुलं वेचायला नेशील तूं गडे ?
कपिलेच्या दुधावर मऊ दाट साय
माया माझ्यावर दाट जशी तुझी माय....!"
[आले भरुन् डोळे पुन्हा गळा नि दाटला
माऊलीच्या भेटीसाठीं जीव व्याकूळला !]
घाल घाल पिङ्गा वाऱ्या ! माझ्या परसांत
माहेरीं जा, सुवासाची कर बरसात !

२९-११-३९
नाशिक

## २७ राग :

छन्द :

चन्दनी पाट, पुढें चान्दीचं ताट ग
चान्दीच्या ताटामध्यें साळीचा भात ग
साळीच्या भातावर दुधाची साय ग
साखर ताई, वर वाढून जाय ग
बाळाचा काय आतां उडाला थाट ग !
भरला कां हा परि काजळकांठ ग ?
—कळालं: राङ्गोळी न घातली भोंतिं ग
कपाळीं म्हणुन् याच्या पडली आंठी ग !

७-८-४२
नाशिक

★

## २८ दिन-चर्या :

छन्द : ओवी-देवीवर

१

पूर्वेचिया उम्बऱ्यांत ठेंच उषेला लागली
'नन्दनां'त वेंचलेलीं फुलें चौफेर साण्डलीं
आणि लाजेनें चढली लाजरीच्या गालीं लाली—
तोंच-फजिती बघाया स्वारी बाळाची उठली !
—झालें ! कशाचें हो, आतां सुचायचें कामधाम !
जागा जाहला ना माझा गोकुळींचा घन:श्याम.

२

साय-साखर घालूनी भात भरवते बाई,
झाली इवल्या हातानें जेवायाची याला घाई !
पहा तरी तोण्ड ! लागे- ओठावर सायशीत
मोगऱ्याची पडे कळी गुलाबाच्या पाकळ्यांत !
-ये ग ताई, ये ग गाई, ये रे काऊ, ये ग चिऊ,
बाळ बैसला जेवाया सारे याला घाला जेवूं !

३

चाल वाजती मञ्जुळ ताल स्वर्ग-सङ्गीताची !
नको धावूं दुडदुड स्वारी कुठें पडायाची !
-बसायचं झोल्यावर ? -काय फिरली लहर ?
घरभर बाळ-राजे ! तुम्ही माण्डला कहर !-
-आला राग कां ? भरला काजळकांठ हो कशानें ?
धरणीला घालणार काय मोतियांचें लेणें ?

४

करा गाई ! चान्दण्याची- शुभ्र घालतें दुलई-
मिटा हळूच पाकळ्या, काय तरी असं बाई !
इतुक्यांत येईलच फुलुनीया रात-राणी,
तिची सुवासाची बोली !- गोड गाईल ती गाणीं !
झोंपीं जाणार बरं का क्षणीं बाळ राजे मग-
स्वप्नीं फुलांचें-पऱ्यांचें आणि बहरेल जग !

१२-७-४२
नाशिक

★

## २९ अकारण हुरहुर ?

जाति : प्रणयप्रभा

मन केविं अकारण हुरहुरते ?
रात काजळी दाटे भंवतीं–
गमते भीषण निगूढ शान्ति
लुप्त होय तारांची कान्ति
रोमाञ्च शरीरीं थरथरते !
मन केविं अकारण हुरहुरते ?
झुळुक थण्ड ये थरकत कुठुनी–
झुळुकत जाई अङ्गावरुनी
काया थरथर कांपते क्षणीं–
परि अन्तर व्यर्थच धडधडते !
मन केविं अकारण हुरहुरते ?
दूर कुठें तरि घुमत पारवा
मधें क्षणच चमकतो काजवा
–भीषणतेचे सैनिक अथवा !
ही रात्र कासया किरकिरते ?
मन केविं अकारण हुरहुरते ?
गत जीवन कां अन्तर्नयनीं–
बिम्बित झालें अवचित मधुनी ?
आज उभविली स्मृति मनीं कुणी ?
जळ नयनांतुन परि झरझरते !
मन हन्त !–अकारण हुरहुरते ?

३१–१२–३०
नाशिक

★

## ३० कशासाठीं अन्तराची....

छन्द : देवीवर

कशासाठीं अन्तराची होई तगमग आज ?
कशापायीं कोसळूं हा येई जीविताचा ताज ?
–वर ढग डंवरले–स्तब्ध वायूचें श्वसन
सन्ध्या–छाया मावळल्या–गेलीं पांखरें दडून–
जीवनाचा उद्वेग ये–मन गेलें अन्धारून
अकारण आणि माझें आलें हृदय भरून !
गळां दाटलेला कसा दाबूं उरांत उमाळा ?
थोपवूं हें तरी कसें धावतसे जळ डोळां ?
जिवा ओढणी कशाची ? हाय ! तेंही न आकळें !
कुणापाशीं, आणि कसें करूं हृदय मोकळें ?

२०–१२–४१
नाशिक

## ३१ हळू हळू येई रात

छन्द : देवीवर

हळू हळू येई रात दुनियेच्या महालांत
काजळाया लागले नी नभ–गिरि–भात-शेत—
छाया, भङ्गल्या घाटाची–नदींतल्या जळांतली–
गेली पुसून, पडतां काळ्या रात्रीची साऊली !

रान–गवताचा वास उग्र हवेंत पाङ्गला
सारें निश्चळ जाहलें मन्द वाराही थाम्बला
एखादाच रातकिडा हळू किरकिरूं लागे
काजव्याची चमचम पलीकडे जाळीमागें–!
गहींवरून आंतून आले भावनांचे कढ
लोचनांची आपोआप आणि ओलावली कड!...

१८–१०–४१
नाशिक

★

## ३२ काहूर अन्तरिं दाटलें :***

जाति : मदालसा

पथ हा किती नित चालणें ? शिणलीं अतां मम पाउलें !
वरती रवी, रण हें तळीं, काहूर अन्तरिं दाटलें !
–कुठुनी कुठें नित चालतों ? क्षण थाम्बतों नच – कासया ?
कसलीं सुखें ? न स्नेहही, प्रीति-प्रभा अथवा दया !

मार्गांतुनी कधिं भेटल्या मज रूप-यौवन-मञ्जरी
ध्रुव-दृष्टि मी – मुरडोनिया कधिंही न पाहियलें तरी.
ध्वनि पैञ्जणांचा त्यांचिया, कानांवरी रेङ्गाळला–
केशांचिया पाशांतुनी सुटला सुगन्धहि सेविला–
क्षण चित्त ना परि मोहिलें-वळुनी तरीहि पाहिलें
मग आज कां सहसा असें काहूर अन्तरिं दाटलें ?
कुणि भेटलें–क्षण थाम्बुनी, लव हांसुनी पुसलें मला
" साथीविना नित चालणें ? पथ केवढा ! हेका खुळा !

एकाकि जीवन कण्ठणें – सिकता–स्थलांतुन चालणें
यम-यातना गमती मना – समजावुनी किति साङ्गणें ?
छायेविना नच वृक्ष, वा मायेविना मन शोभलें !....
झिडकारुनी पथिं चाललों; काहूर अन्तरिं दाटलें !

सन्ध्या हळू पद टाकिते जगतावरी अनुरागिणी
घरट्याकडे विहगावली वेगें निघे व्योमांतुनी !
चोंचींत घालुनि चोंच तें द्विज-युग्म गुञ्जनिं गुङ्गलें–
निज कोटरीं–सहसा दिसे, काहूर अन्तरिं दाटलें !
गात्रें अतां पाङ्गूळलीं–पडती पुढें नच पाउलें....
जाणें पुढें सखिव्रांचुनी नच–आणि काहुर शान्तलें !

२–२–४०
नाशिक

★

## ३३ शिशिर अजून सम्पलाहि नाहीं :२**

मुक्तछन्द

शिशिर अजून सम्पलाहि नाहीं
तोंच मधूनच कानीं येतसे
वसन्तऋतूच्या वेणूचा सूर,
आणिक जीवाला लागून राहे
गूढ हुरहूर
अज्ञात ओढ कसली तरी !

दूरच दूर ही रेङ्गाळे वाट
बाजूंस दोन्ही
निःस्तब्ध उभे हे निष्पर्ण वृक्ष....
वाळून गेलेलीं पिवळीं पानें
तळाशीं तयांच्या....!
मधेंच एखाद्या पिम्पळावर
नवीन नाजुक पालवी दिसे
उषेच्या कोमल तळव्यापरी–
साण्डलीं जीवर सायङ्काळचीं
मळूल उन्हें !
उदासपणाची भरून राहिली सर्वत्र छाया !

लाम्बच लाम्ब
पडल्या सावल्या जीर्ण वृक्षांच्या
अवचित आणि
सन्थ तरङ्गत
बगळा एखादा निघून जाई–
दूरवर दिसे मुशाफर कोणी
सावकाशपणें चालतो वाट
विषण्ण शान्ति ही !
निराश एकान्त ! !

आणि नकळत
इकडे आणिती पाऊलें मज

भग्न आशेपरी पूल तो पडका
येतो ओलाण्डून
पायाशीं तयाच्या सांचलें दिसे
निस्तब्ध, खिन्न, हिरवें पाणी–
कितीतरी आणि पुञ्ज लव्हाळ्यांचे !

सहसा माझी नि मन्दावते गति
येऊन बसतों कसा तरी मग
चौथऱ्यावर या पडक्या वाड्याच्या–
अवशिष्ट आज राहिली आहे
एकच भिन्त !
ढिगारा केवढा दगड-विटांचा
भोंवतीं पडे ! !
–वास्तुदेवतेच्या मनोरथाचीं हीं
शकलें भेसूर–
क्वचित् भग्न त्या अवशेषावर
येऊन बसतो एखादा पक्षी
आणि वाटते जाहला जरा
हृदयावरचा भार हलका
एकाकीपणाचा, औदासीन्याचा !

करून विचित्र आर्तनाद तोंच
उडून जातो तो दूर कुठेंतरी !
मात्र अधिकच वाढते ओझें
कालवाकालव आंत होते कांहीं

गहींवर येतो
आणिक क्षणांत जमून येती
डोळ्यांत आंसवें !

छातीवर हात ठेवूनी दोन्ही
कुठेंतरी मी खिळवितों माझी
बाष्पान्ध दृष्टि....!

आणिक एखाद्या पिम्पळावरी
नाजुक नूतन पालवी दिसे
उषेच्या कोमल तळव्यापरी !!

१२-५-४२
नाशिक

★

## ३४ जीवन-रेषा

जाति : पादाकुलक

तुझ्या नि माझ्या जीवन-रेषा
परस्परांना भिडल्या येउन—
आणि वाटलें: वाट चालणें
करांमधीं कर गुम्फुन येथुन !

परस्परांना ओलाण्डुन परि
जीवन-रेषा गेल्या अपुल्या—
आशा विद्युल्लतेपरी अन्
क्षण दिपवुनिया, क्षणांत विरल्या !

मात्र सुवर्ण-क्षणिं त्या एका
उजळुन गेलें अवघें जीवन
शत जन्मांतिल पुण्य-पयाचा
सेक जाहला वा स्वर्गांतुन—

आणि संगम-स्थलिं त्या आपण
स्मृति-स्तम्भ उत्तुङ्ग उभविला
दिव्य मीलनोत्सव अपुला अन्
तेथ शिलालेखांत कोरला...

—आतां कधिं निजमार्ग चालतां
शिणुनी रेङ्गाळतां पाउलें,
शिलालेख तो फिरुनि वाचणें....
—जीवन झालें हेंच आपुलें !

★

## ३५ जीवन-सौन्दर्य: *

सुनीत

सृष्टी पाङ्घरुनी यदा मखमली अङ्गावरी चान्दणें
निद्रा घेइ निवान्त – शान्ति भंवतीं दाटूनिया राहते !
मी-निर्बन्ध न कांहिं, छे ! – भटकतों धुन्दींत माळावर
शान्त, स्निग्ध विभावरी मज अशी सम्मोहिनी घालिते.

पुष्पांना फुलवीत नित्य अथवा येतां उषा-सुन्दरी,
सन्ध्या रङ्गविते यदा गगन वा वासन्त सायन्तनीं,
कारुण्योत्कट, रम्य भाव कवनीं वा गुङ्ग होतां कधीं–
–मी सौन्दर्य-पिपासु, सेवित सदा विश्वांतली चारुता !

–येती वृत्ति उचम्बळून बघतां सौंदर्य हें आगळें–
चित्तीं तत्प्रतिबिम्ब गोड पडतां, होतात संवेदना !
साक्षात्कार अनन्त होउन असे – साकार मूर्ती तुझी
माझ्या राहिलि, रेखिल्यासम उभी, सौन्दर्य-देवी हृदीं !

कान्तीनें तव गे, पुरे उजळिलें माझें मनोमन्दिर...
झालों आपण एकरूप – गमतें, “ सौन्दर्य हें जीवन ! ”

२६–८–४१
नाशिक

★

## ३६ मरणार कुढुनि मी :

जाति : भूपतिवैभव

१

स्वच्छन्द गातसे जग अपुल्या नादांत !
—मरणार कुढुनि मी मात्र आंतल्या आंत !

—वैभवें कुणाच्या लोळण घेती चरणीं,
सौन्दर्य कुणाच्या नान्दतसे नित सदनीं,

कुणि वितरी इकडे अपूर्व गीत-विलास,
दरवळति कुणाचे सुखमय मधु उच्छ्वास,

जाहली कुणावर प्रसन्न कमला-राणी,
हा विनम्र झाला कुणी शारदा-चरणीं,

पसरली कुणाची कीर्ती अमर, दिगन्त,
कुणि गात हिण्डती प्रणयाचे शुभ मन्त्र !

—हे मग्न सेवनीं भाग्यवन्त सौख्याच्या—
मग फोडुं कशी मी मम दुःखांना वाचा ?

कां घालुं तयांच्या विरजण आनन्दांत ?
मरणार कुढुनि मी असा आंतल्या आंत !

२१-६-४१
नाशिक

अश्रूंनो ! देऊं कशी तुम्हांला वाट ?
मरणार कुढुनि मी हाय ! आंतल्या आंत

—वाटतें कुणाला अपुलें दुःख कथावें
बम्बाळ जाहलें हृदय हळुच दावावें;

हळुवार तिथें तो फिरविल अपुला हात—
होईल डोम्ब तों जरा आंतला शान्त !

—छे ! व्यर्थ आस ही; जग इतुकें न दयाळू—
पाहील जळाल्या हृदयासहि तें जाळूं !

दावितील कोणी सहानुभूती खोटी,
कुणि मीठ साण्डतिल खुशाल जखमेवरती !

फेकितील कोणी वाक्शर हाय ! विषार !
विन्धितील सहसा मम हृदया हे वार ! !

ते सह्य न होतिल मज निर्घृण आघात !
मरणार कुढुनि मी असा आंतल्या आंत !

२१-६-४१
नाशिक

३

" दडवुनी दुःख निज हृदयाच्या हृदयांत
मरणार कुढुनि मी असा आंतल्या आंत !"

ही निष्ठुर शिकवण नित्य जिवाला देत
पाहतों—पाहिले मीं रविचे उदयास्त !

—परि कधीं भावना होउनिया अनिवार
या असह्य होती जिवा यातना फार...

वाटतें, अतां मम हृदयच हें फुटणार....
शोधाया निघतों म्हणुनि तया आधार !

—तों आक्रन्दन ये आर्तांचें मम श्रवणीं
निश्वास....हाय ! कोसळेल गमते, धरणी !

सौख्याच्या विरल्या, वरल्या बुरख्याखालीं—
हा ! दृष्टिस पडते ही जखमांची लाली !!

जग असे चूर हें आपुल्याच दुःखांत !
मरणार कुढुनि मी म्हणुनि आंतल्या आंत !!

११-११-४१
नाशिक

★

## ३७ राऊळांत

छन्द : देवीवर

रात भीषण अन्धारी होती भोंवतीं दाटली
तरङ्गत होती नभीं काळीशार मेघावली.

त्याच मेघ-मार्गातुन पश्चिमेच्या मन्दिरांत
'निद्राराणी'चा स्वर्गीय गेला काजळाचा रथ.

रथचक्रांचा निनाद हळू हळू मन्द झाला
सौम्य शान्ततेंत आणि पार विरूनीया गेला !

कशी तरी अशा वेळीं सावरीत फुलवात
अन्तरींच्या विश्वासानें आलें तुझ्या राउळांत—

गूढ, अस्पष्ट, सुस्वर निद्राराणीचें सङ्गीत
होती गात रानजाई तिची मला झाली साथ !

तुझ्या वदनीं पडतां फुलवातीचा प्रकाश
तुझ्या ओठींच्या पावल्या हास्य-लहरी विकास

माझें फुललें हृदय तुझें घेऊन दर्शन
सुख-रोमाञ्चांनीं माझी काया गेली थरारून.

तल्लीन मी असतांना दिव्य-दर्शन-सुखांत
अकस्मात हाय ! माझी मालवली फुलवात !

क्षणभर बन्द झालें    माझें हृदय-स्पन्दन
'जीवना'नें दुज्या क्षणीं केलें आर्त आक्रन्दन !

आणि तोंच आपोआप आत्मज्योत पालवून
स्वान्तीं प्रकाश फांकला पूर्ण हरपलें भान !

१२-३-४२
नाशिक

★

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

## ३८ मनोरथांचें मनोगत :

जाति : अञ्जनी

मनीं-मानसीं हळुच प्रवेशुन
करामधें कर सहजीं गुम्फुन
गीत-स्वर चिर-मधुर पालवुन
त्या छन्दावर गुङ्गत राहूं आम्ही दिनरात !

विश्व-कमल मिटतां सायन्तनिं
ज्योत्स्ना येई लाजत भुवनीं
मधुर जादुची करित पेरणी
वसनें आमुची मृदुल शुभ्र त्या मन्त्रित जादूनें !

चुम्बुनि नाजुक निज अधरांनीं
उषा पहांटे गुलाब फुलवुनि
हास्य शिम्पिते त्यांच्या वदनीं
त्या पुष्पांचें हास्य आमुच्या ओठीं खेळतसे !

फुलतां कुसुमाकर कुञ्जांतुन
दरवळ अवघा राही दाटुन
झुळुक हळुच त्या नेई पळवुन
झुळुकेसम त्या श्वसन आमुचे गन्ध-मधुर, मृदु, शीत् !

–सोनेरी निज पङ्ख उभारुन
तुमचे भाव तयावर पेलुन
करीं कल्पना तुमच्या झेलुन
मनोनभांतुन सदैव आम्ही करितों स्वैर-विहार !

–आणिक अमुची किमया अद्‌भुत
हवें तिथें नेईल तुम्हां द्रुत
त्रिभुवन आणिल चरणीं हांसत
क्षणीं तुम्हाला ब्रह्माण्डाचा बनविल अधिराणा !

तुमच्या कीर्तीचीं मधु-गाणीं
सुराङ्गना गातिल स्वर्गांतुनि
जयमाला अर्पितील रमणी
स्वर्ग-सुखांचा अनुभव देऊं तुम्हास निमिषार्धीं !

स्फटिकांचे प्रासादहि उभवूं
भंवतालीं नव ‘ नंदन ’ फुलवूं
कनकाचे झोपाळे झुलवूं
कारञ्जांतुन मधु-स्मितांचे उडवूं रम्य-तुषार् !

अशक्य तें अति-सुलभ करूं क्षणिं
अप्राप्याला नमवूं चरणीं
निर्मूं वाळु-रणीं निर्झरिणी
नवलपरीचीं साञ्जढगांवर चित्रें अमर करूं !

—आकाङ्क्षांच्या उदरीं येउन
साज मनोहर, अभिनव लेउन,
सोनेरी सुख-स्वप्नें उभवुन—
क्षण सुखवावें आतुर मानस;— हें जीवन अमुचें ! !

६-८-४२
नाशिक

★

## ३९ नवीं भविष्यें

जाति : पादाकुलक

वर्तमान दैत्यापरि भीषण
विसराया शय्येवर पडतां
पुण्यात्म्यांच्या कर्तृत्वापरि–
येसि भविष्या ! प्रकाश फुलवित !

–आणिक मग मी होउन उन्मन
रेखित बसतों नवीं भविष्यें–
अंधारावर नक्षत्रापरि
दिव्य उमटती प्रकाश-चित्रें !

अशीच जाते रात्र सम्पुनी
भविष्य ये वर्तमान होउन–
स्वरूप तें जवळून पाहतां
अन्तर जातें विन्धुन-भङ्गुन....

अनुभव हा रोजचाच झाला !
–रोजच तरि शय्येवर पडतां
अन्धारावर नक्षत्रापरि
रेखित बसतों प्रकाश-चित्रें !

★

## ४० एक शङ्का :*

जाति : दिण्डी

—आणि आतां शिरिं घाव घालणार
तोंच वरच्यावर धरी कुणी हात,
वधिक पाही वळवुनी स्तिमित मुद्रा
" वरं ब्रूहि । "–प्रभु–मूर्ति तों म्हणाली.
भक्त सांपडतां घोर सङ्कटांत
देव येतो धावूनिया विमानीं.
—पुराणींचे हे दाखले अनेक
आज येई अनुभवा वेगळेंच !
स्वैर वागति उन्मत्त मात्र आतां
देति भक्तां निःशङ्क देह-दण्ड,
खून मानवते ! तव जगीं जहाला
शेष-शय्या तरि सौख्य दे प्रभूतें ?
—मात्र भक्तांची मधुर भाव-वाणी
पुसे : 'अजुनी प्रभु कां न धाव घेइ ?'

देव रमला अपुल्याच विलासांत—
म्हणुनि सन्तापुनि कुणी भाविकानें
चिडुनि केला विध्वंस काय त्याचा ?—
—एक शङ्का चाटून मना जाई !

७-८-४२
नाशिक

★

## ४१ उन्मत्तास

मुक्त : छन्द

आतां कशाला—
आवरता हा घेतोस हात ?
टाक ना करून पुरता निःपात
युगानुयुगें साहुनिया तव निर्घृण घण
निघाला पिञ्जून मदीय देह
राहिलें न कांहीं तयांत त्राण....
अस्थिर....कांपरी हो जीव-ज्योत....!
—आला अन्त्यक्षण....!
कशास आतां हा आवरता हात ?
कशास आतां हा केवळ निष्ठुर आघात दयेचा ?
घाल माथां तो प्रचण्ड घण
ओढ आसूड सर्वाङ्गावरती
पडेल क्षणीं अन्—
निष्प्राण हा देह धरणीवरी !
या अन्त्यक्षणीं कां हो करांतलें सामर्थ्य गलित ?
लुप्त कां जाहली पाशवी शक्ति ?
निर्घृण हृदय केविं ओलावलें ?
फुटला कसा हा पाषाणा पाझर ?
छे ! न ही दया !
नच ही करुणा !

अन्तराळामधीं
स्वातन्त्र्यांत, स्वैर विहरणारा
धरावा रावा–
[ निष्पाप बिचारा ! दुबळा परन्तु ! ]
कोण्डावें तयास
पिञ्जऱ्यामधें अनन्तकाल
करावें तयाचें पंख निकामी—
भरारी घेण्याची उभारी तयांत मुळीं न उरते !
करावें उघडें पञ्जरद्वार अन्
“ जा जा ! मोकळा तूं–” म्हणावें तयास—
–आणखी खुशाल दयेचें पुण्य धरावें जमेस !–

कां ही नय-नीति ?
करुणा-दया ?
परिसीमाच ही निष्ठुरतेची.

येतो अन् क्रोधानें भरून माझा
दुबळा ऊर !
सन्तापानें आणि जळतो देह !

पहा पहा हीं !–उघडून डोळे–
पराक्रमाचीं तुझियाच रे ! हीं स्मारक-चिन्हें
माझ्या अङ्गावर–
हृदयावर
रक्ताळुन गेलें सारें हें शरीर
जागजागीं हे वाळून गेले रक्ताचे ओघळ,

काळवण्डली आणिक चर्या !
धुळींत वाहून रक्ताचे पाट
धरणीहि गेली काळवण्डून
सङ्गतच ही पार्श्वभू माझिया निष्प्राण जीवना—
आणि तो आसूड ?–तुझ्या हातांतला–
पहा ! चिकटलें—
तयास माझें निष्पाप मांस !

अन् माझें हृदय ?
कशास पुससी दुर्दशा त्याची ?
केंव्हांच झालें तें बम्बाळ तुझिया शब्दशरांनीं !
अपमानाच्या ठिणग्या तीव्र
सन्तत वर्षून–
केलास ना त्याचा राक्षसा ! संहार !
अग्निवर्षणीं आणखी त्या, हाय !
गेला जळून
माझा स्वाभिमान आत्मविश्वास !

निस्सार जाहलें जीवन अवघें–
छे छे ! चुकलों
निस्सार केलेंस जीवन माझें !
आणि रे उन्मत्ता !
घेऊन बळी केवळ माझाच
मुळीं न जाहली परिपूर्ण तुझी पाशवी तृष्णा !
जाहलास नच कृतकृत्य तूं तितुक्यानेंच–
माझ्याच सारख्या असङ्ख्य जीवांचे

जीवन-घोंट [ आणि शिव्या-शाप ] घेतलेस तूं !
आम्ही सारेच
सन्तत निघतों भरडून रे ! तुझिया चक्रांत —
साऱ्यांचाच तूं केलास आहे धुन्दींत घात !
आतांच मग कां आवरता रे, घेतोस हात ?

घाल एकच कठोर घाव !
तत्क्षणीं होईन गतप्राण मी–
फोडीत किङ्काळी कण्ठरवानें !
–उडतील आणि उष्ण चिरकांड्या रक्ताच्या भोंवतीं !

आणि कदाचित्—
देतील चेतना अन्य जीवांना त्या
झडेल तयांचा दुबळे-पणा
जागृत होईल अन् स्वाभिमान
उठतील ज्वाला क्रोधाच्या कराल
भावाचें आपुल्या पाहून प्रेत !

–सूडाचा उठून हृदयीं डोम्बाळा
[ घालतील ते गवसणी नभा ! ]
घेतील तुझिया नरडीचा घोंट !
धुन्दी उतरेल डोळ्यांतील तुझ्या सत्तेची–गुर्मीची !

विरेल उन्माद !–
आणिक तुझ्या त्या मत्त रक्तानेंच
रञ्जित होईल क्रान्तीची पहांट....
नी जगीं नान्देल राज्य समतेचें !

२६–६–४१
नाशिक

## ४२ जीवन्मृताचें शिणतों जिणें मी !

वृत्त : इन्द्रवज्रा

हेमन्त येवो, विलसो वसन्त,
त्याला नसे मात्र उसन्त कांहीं
पाठीवरी नित्य असे पखाल
रेडा जळावीण परन्तु मेला !
बागेंत पुष्पें फुललीं अनन्त
वाऱ्यावरि गन्ध दिगन्त जाय–
रात्रन्दिनीं शिम्पुनि रक्त-बिन्दु
माळ्याचिया मात्र करांत कांटे !
रे ! तापतां भास्कर चण्ड, माथां
छाया करि शीतल भोंवतालीं,
साहूनिया नित्य असे उन्हाळे
अन्तीं तरू हाय ! वठून गेला !
आजन्म गाऊन जगास दु:खी
त्यानें दिली अद्‌भुत शान्ति कांहीं
–त्याची कहाणी पुसतां कशाला ?
चिन्ता जिवा जाळि सदा विखारी !
गेहांत माझ्या घट अमृताचे,
हा अङ्गणीं कल्पतरु विशाल,
अन् दावणीला सुरभी परन्तु
जीवन्मृताचें शिणतों जिणें मी !

१–७–४२
नाशिक

## ४३ रे सम्पल्यावर भैरवी

जाति : मदालसा

रे ! सम्पल्यावर भैरवी कां सूर आतां छेडिशी ?
ये पूर्णता चित्रास या, कां रङ्ग आणिक ओतिशी ?

फिरतां तवाङ्गुलि सुन्दरा ! स्वर-कम्प जागृत जाहले,
न्यारी तुझी स्वर-माधुरी, रस भाव तींतुन दाटले;
गाऊनिया मधु गीतिका तूं भारुनी मज टाकिलें,

गमले तदा : उधळीतसे स्मित-चन्द्रिका हंसरा शशी !
रे! सम्पल्यावर भैरवी कां सूर आतां छेडिशी ?

गानीं तुझा प्रिय गायका ! सहजींच अन् लय लागला
वायूचिया लहरींवरि फुलला लकेरींचा मळा !
गीतांचिया सुमनीं सख्या ! भृङ्गापरी जिव लोभला,

रचिलीस तूं स्वर-कम्पनें मधु जादुची दुनिया अशी !
रे ! सम्पल्यावर भैरवी कां सूर आतां छेडिशी ?

तुझिया स्वरांतिल आर्तता भिडली जिव्हारीं जाउनी
अन् सूप्त आन्तर भाव ते सह-कम्पले दुसऱ्या क्षणीं,
तल्लीन वृत्ती जाहल्या त्या उन्मनीमधि गुङ्गुनी....

घेऊन उञ्च लकेर तों येशी समेवर, थाम्बसी !
रे ! सम्पल्यावर भैरवी कां सूर आतां छेडिशी ?

हेलावल्या हृत्सागरीं ये गूढ आतां शान्तता,
हृदया हवें तें लाभलें, जें ये न बोलुनि दावितां
ये या क्षणाप्रत शाश्वती, ये प्रत्यया समृद्धता....

निस्तब्ध या पृष्ठावरी निर्मूं नको वलयें पुन्हां !
रे ! सम्पल्यावर भैरवी छेडूं नको स्वर मोहना !

१५-११-४२
नाशिक

★

## ४४ कणिका

जाति : भूपतिवैभव

या अनन्त, अक्षय, विराट मार्गावरती
अनिवार जाहली पद-चिन्हांची दाटी—
वाटलें : यांतल्या चार खुणा अपुल्याही !
–या अभिमानें मीं उलटुनि मागें बघतां—
माझींच पाउलें आलिं न मज ओळखतां !

* * *

स्वप्नांत पाहिलें : मी झालों नव-मेघ
जल शिम्पूं–गमलें–जिथें पेटली आग
मरुभूवर आलों म्हणुनि स्नेहलतेनें !–
तों दग्ध कराया मलाच आल्या ज्वाळा–
माझ्याच उरींचा आटुनि जाय जिव्हाळा !

* * *

‘ रे ! आशा म्हणजे क्षितिजावरली तारा–
क्षितिजासह–जातां निकट–पळेल भरारा ! ’
कुणि करी मला हा अनाहूत उपदेश !
कां खन्त तयाची मज ?–मीं तर निःशङ्क–
गगनाचा घ्याया वेध पसरले पङ्ख !

*            *            *

मज ‘ अबोल ’ म्हणती माझे मित्र सदाच,
परि सङ्गतींत तव, जिव्हा करिते नाच !
अन् साङ्गूं कां तुज नवल आणखी एक ?
तव मैत्रिणींत तूं ख्यात ‘ बोलकी ’ म्हणुनी,
मम सहवासीं परि मूक तुझी हो वाणी !

*            *            *

“ सखि प्रियंवदे ! ही काय तुझी गऽ घाई !
दर्भाङ्कुर रुतला हा तर चरणीं बाई
अडकला पदरही कोरण्टीला मेला....”
“ छे ! शकुन्तले गे ! दक्शर रुतला हृदयीं
अन् जीव अडकला दुष्यन्ताच्या ठायीं ! ”

*            *            *

मम निष्फल झाली होती पहिली प्रीत
त्या रुक्ष हृदयिं तूं ओतिलेंस सङ्गीत !
–पूर्वील साङ्गतां कधिं तुज भाव-कथा ती—
कां भरून आले नेत्र तुझे गे राणी ?
कां अशीच होती तव ही भाव-कहाणी ?

*            *            *

ऐश्वर्य नान्दतें इंद्राचें सदनांत
कुणि दूर लोटिती वैभव तें निमिषांत—
जनसेवेसाठीं; [ वंदन त्या थोरांना ! ]
परि कुटींत माझ्या एक न कण धान्याचा !
मीं—वदा !—करावा स्वार्थ-त्याग कशाचा ?
* * *
पूर्वेस काञ्चनी करुनी अद्भुत किमया
तेजोमय शिम्पुनि जीवन-रस जगतीं या,
क्षितिजावर ये तो हांसत किमयागार—
कलकलाट करुनी दिवाभीत तों वदलें
" विश्वावर कसलें सङ्कट हो, कोसळलें ?"
* * *
" त्राता न कुणी तुजवांचुनि आम्हा देवा ! "
रे ! म्हणून आम्ही तव चरणाश्रय घ्यावा.
परि दुर्बलतेमधिं अमुच्या तव सम्भव, हें—
प्रगटतां सत्य; तूं वदशिल देवा वच तें:
" मानव हो ! आतां तुम्हीच माझे त्राते !"
* * *
बाहेर कहर करि भीषण काजळ-रात
अजगरापरी भू गिळतो वादळ-वात
गगनोदर नरसिंहापरि वीज विदारी !
अन् लावुनि समई शान्त मात्र मी आंत
चाळीत पहुडलों प्रिय कवितांचा ग्रंथ !

१९४२–४३
मालेगांव–नाशिक

## ४५ टीकाकारांस

गज्जल : पाण्डव

अन्तरात्मा—छे, न ! हो, हें पेटलेलें स्थण्डिल
भावनांचे चाललेले नित्य हे येथें बळी !

स्वप्न-मूर्ती अन्तरींच्या दग्ध होती सारख्या—
देखतां डोळां नि होतीं भस्म ध्येयांचीं फुलें.

हात दाबूनी उरीं मी हाय ! सारें साहतों !—
होतसे केव्हांतरी तें शान्त अन्तः स्थण्डिल—

सांचती त्याच्या तळाशीं आणि राखेचे थर
श्रान्तलेलीं लोचनें एकाग्र होती त्या स्थलीं !

अन् अकस्मात् दृष्टिला येती तिथें तेजःकण—
छे न ! तेजोदेवतेचे दीप्तिमान् निश्वास ते !

श्रान्त झाल्या वृत्ति जाती हर्षुनी-वेडावुनी—
अक्षरांनीं गुम्फिती अन् त्या कणांची मालिका !

—आणि टीकाकारहो हो ! ही भेट घेऊनी करीं
मन्दिराशीं आपुल्या मी तिष्ठतों रात्रन्दिन

वाटतें : घालाल कण्ठीं—थोर तुम्ही !-माळ ही
आणखी वाटेल या जीवास कांहीं धन्यता !

हाय ! ही केव्हां न येते आस प्रत्यक्षीं परी
आणि गांठीं बान्धुनी हेटाळणी मी जातसे—

येः परी सर्वत्र कानीं आपुला कोलाहल
मूक दुःखाच्या कढांनीं अन् भरे ही ओञ्जळ !
थाम्बवा ! ही विंन्धुनी जाई जिवा कोल्हेकुई !
छे ! परन्तू चालुं द्या, हे गर्वितांनो ! गर्जना—
ओरडूनी कोरडा अन् कण्ठ होतां आपुला—
हेंच अश्रूंचें मुखीं घालीन मी गङ्गोदक !

२९–१०–४३
नाशिक

★

## ४६ वैशाखींचें ऊन :*

छन्द : देवद्वार

वैशाखींचें ऊन दाटें सभोंवार
आग अङ्गावर ओती कुणी !

वाळवण्ट दीर्घ क्षितिजापर्यंत
त्यांत माझा पन्थ शोधितों मी.

शिणला हा जीव चालतोंच तरी
सम्पते न परी वाळूरण !

—त्यांत अनवाणी, भार पाठीवर,
आगीचा कहर वर-खालीं

ओठ सुकलेले रसने रस न
मृगजळीं प्राण जाती माझे !

* *

—आणि अकस्मात मेघ—मयूरांनीं
पिसारे गगनीं— पसरले....

झुळुका शीतळ— झळा लोपुनीया—
लागल्या वाहाया झुळझुळु

दिसली तों रम्य दाट आम्बराई
पातलों त्या ठायीं लागवेगें

अवचित तेथें राया ! भेटलास
दिलासा दिलास श्रांत जीवा !

दृष्टींतून तुझ्या ओसण्डे जिव्हाळा
वाणींत स्नेहळा, सुधा गोड !

हृदयांत माया निर्मळ अपार,
अन्तर उदार, थोर तुझें !

ओठीं घातलेस माझिया, अमृत
दाह झाला शान्त क्षणीं माझा.

अङ्कीं आणि तूझ्या टेकविला माथा
लागे तो अनंता ! गाढ निद्रा !

* * *

अनुक्रम ९७७५३
विभाग वां. क्र. १०४
क्रमांक ९२८७
नों. दि. ३।१।५६

—जाहलों जागृत–      कुठें आम्बराई ?....
आणि कोण्या ठायीं.... सखा माझा ?....
कुठल्या झुळुका ?.... अमृत कुठलें ?....
ऊन हें दाटलें      वैशाखींचें !

....आणि श्रान्त जीव चालतों त्यांतून
मृगजळीं प्राण....      जाती, वाटे !!

२८-३-४१
नाशिक

★

## ४७ ज्ञानेशा !

जाति : पर्वति

आळन्दी ! ओजस्विनि देवी, तूं तेजाची ऋचा
स्वत्वाचा येथेंच घेतला गे, आम्ही पर्वचा !

मांजतां काळोखाचें रण
बान्धुनी करीं अग्नि-कङ्कण
प्रकाश मार्गीं फेंकलास तूं ज्ञानेशा ! क्रान्तिचा !

भाबडीं निजलेलीं अन्तरें
जागवुन अपुल्या उच्च-स्वरें
ओतलास सन्देश शुभोज्ज्वल येथें निज हृदयिंचा !

" माझा मऱ्हाठाचि कवतुकें. "
करुनी गर्जन हें सारखें
दिव्य मन्त्र फुङ्कलास फुलला स्वाभिमान आमुचा !

अभिव्रत सेवुन रात्रन्दिन
साहुनी विपदाकुल जीवन
कण कण वेंचुन अलङ्कार रचिलास माय बोलीचा !

आजही ओवी तव वाचुनी
उरीं मम गहिंवर ये दाटुनी
नम्र शीर्ष हें नकळत होई-प्रभाव तव वाणिचा !
स्वत्वाचा येथेंच घेतला रे ! आम्ही पर्वचा !

९-८-४२
नाशिक

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि. 23/9/

★

# टीपा

**कशी येशील ?** : 'यज्ञकुण्डांतुन द्रौपदी निघाली०' द्रौपदी ही योनिसम्भवा नसून यज्ञसम्भवा आहे. द्रुपदानें द्रोणवधासाठीं अपत्यें लाभावीं म्हणून जो यज्ञ केला त्यांतून ती प्रगट झाली.

**भविष्यकाला** : 'वीरभद्रानें......दक्षयज्ञासम०' दक्षप्रजापतीनें केलेल्या यज्ञास शिव-पार्वतींना हेतुतःच बोलावलें नव्हतें. तरीहि पार्वती आमंत्रणाशिवायच तेथें गेली असतां तिचा अवमान झाला. त्याचा सूड घेण्यासाठीं आपल्या जटेपासून शंकरानें वीरभद्र निर्माण केला. या वीरभद्रानें शंकराच्या आज्ञेवरुन सारा दक्ष-यज्ञ उध्वस्त करून टाकला.

**निर्दय होउन तरि ये क्षणभर** : 'तें तर माझें, श्रीपदलाञ्छन'. एकदा ब्रह्मा, विष्णु, महेश यांत श्रेष्ठ कोण, याची परीक्षा करीत भृगु हिण्डत असतां, वैकुण्ठास येऊन त्यानें विष्णूस लाथ मारली. परंतु विष्णूनें न रागावतां उलट त्यालाच नमस्कार केला. तेव्हां 'तूंच श्रेष्ठ आहेस' असें भृगूनें म्हटलें. भृगूची लागलेली लाथ विष्णूनें 'श्रीवत्सचिन्ह' वा 'श्रीपदलाञ्छन' म्हणून वक्षावर धारण केली.

**मीनाक्षी** : "पार्थानें पाताळीं सोडिलाशर......आणिला वर०" भीष्म शरपञ्जरीं पडले असतां त्यांना तहान लागली; तेव्हां पार्थानें पाताळांत बाण मारून पाताळगंगा मर्त्यलोकीं आणून त्यांच्या तृषेचें निवारण केलें.

**काहूर अन्तरिं दाटलें** : 'रण हें तळीं'; रण = वाळवण्ट.

**तिलोत्तमे** : सुन्दोपसुन्दांना ठार करण्यासाठीं प्रत्येक सुन्दर वस्तूंतील तीळतीळ सौंदर्य घेऊन हिला निर्माण केलें. हिच्या सौंदर्यप्रभावानें देव देखील वेडे होऊन गेले. हिनें सुन्दोपसुन्दांत आपल्या लावण्यप्रभावानें भाण्डणें लावून त्यांचा परस्परांकडून नाश करविला.

६६५८४

REFBK-0006654
REFBK-0006654